# माजलगावमध्ये दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई


दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१२५ | शुक्रवार दि.०९ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-125 | Friday, Dt.09 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


# पोटच्या मुलीवर अनैतिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापास ७ वर्षांचा सश्रम कारावस

## शिरूर कासार पोलिसांची संवेदनशील व शिस्तबद्ध तपासाची यशोगाथा



प्रतिनिधी @ बीड

शिरूर कासार पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं. १४७/२०२४ या अत्यंत संवेदनशील झजउडज प्रकरणात शिरूर कासार पोलिसांनी केलेल्या अभ्यासपूर्ण, शिस्तबद्ध व मानवी दृष्टिकोनातून केलेल्या तपासामुळे आरोपीस कठोर शिक्षा न्यायमुर्ती एस.एस. घोरपडे विशेष सत्र न्यायालय, बीड यांनी सुनावली आहे.

दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच वडिलांकडून वारंवार शारीरिक मारहाण व लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली. पीडितेने दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी थैयनि शिरूर कासार पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ७४, ७५, ७६, ११५ तसेच POCSO अधिनियम २०१२ अंतर्गत कलम १० व १२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली.

तपासादरम्यान पीडितेचा सविस्तर व विश्वासार्ह जबाब, साक्षीदारांचे जबाब, तसेच आवश्यक महत्त्वाचे पुरावे तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी गोळा करून त्याची योग्य मांडणी करुन दोषारोपपत्र वेळेत व भक्कम पुराव्यानिशी सादर करण्यात आले.

सदर खटला मा. न्यायमुर्ती एस.एस. घोरपडे विशेष सत्र न्यायालय, बीड यांचे न्यायालयात चालला. मा. न्यायालयाने पुराव्यांचा सखोल विचार करून आरोपीस दोषी ठरवले. नराधम आरोपीस झजउडज कलम १० अंतर्गत ७ वर्षे सक्तमजुरी, झजउडज कलम १२ अंतर्गत ३ वर्षे सक्तमजुरी, इछड कलम ११५ अंतर्गत ६ महिने शिक्षा, आर्थीक दंड व पीडितेला भरपाई अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी केला तर सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. ए. बी. तिडके यांनी जोरदार युक्तीवाद केला आहे. तसेच पैरवी अधिकारी म्हणुन श्रेणी पोलीस उपनिरीक्षक गोविंद सानप यांनी कामकाज पाहीले आहे.

## मेथीच्या जुडीला बाजारात दर नसल्याने जनावरांच्या दावणीत मेथी....!



दावरवाडी/प्रतिनिधी

दावरवाडी येथील बुधवारी या दीवशी आठवडी बाजार भरत असतो मागील पाच ते सहा महिने बाजार भाजीपाले तेजीत विक्री होत होती सात जानेवारी चा आठवडी बाजार भाजीपाल्याला भावच नव्हता वांगे दोन महिन्यापूर्वी चाळीस रुपये पाव विकले गेले मेथीची जुडी पंधरा रुपयाला एक होती कालच्या आठवड्या बाजारात मेथीच्या जुड्या दहा रुपयाला चार विकल्या वांगे पंधरा रुपये किलो विकले मेथीच्या भाजीची खूप घसरण झालेली दिसत आहे दहा रुपयाच्या पाच जुडी विकली भाव नआल्याने शेतकऱ्यांनी मेथी जागेवर ठेवून दिली लोकांनी भाजीचे गठुडं उचलून आपल्या जनावरांना खाऊ घातली मेथी वांगे कोथंबीर भाव नसल्यामुळे जनावराच्या दावणीत जनावरे खाताना दिसत आहे शेतकऱ्यांना वाहतुकीचा खर्च निघत नसल्याने संताप व्यक्त करत आहे

# बीड शहरातील नागरिकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी भाजप आक्रमक

## भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह नगरसेवकांचे सीओंना निवेदन

प्रतिनिधी @ बीड

नगरपरिषद निवडणुकीनंतर बीड शहरातील विविध प्रभागांमधील नागरिकांनी मूलभूत नागरी सुविधांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी व मागण्या केल्या आहेत. त्या तातडीने मार्गी लावाव्यात, अशी मागणी नगरपरिषदेतील भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे मंगळवारी (दि.६) निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी भाजपच्या नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

बीड शहरातील पाणी पुरवठा, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, आवास योजना, पार्किंग, महसूल वाढ, तसेच बिंदुसरा नदी सुशोभिकरण यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर

(उर्वरीत पान २ वर)



### मुख्याधिकाऱ्यांचा सकारात्मक प्रतिसाद

भाजपच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. आवश्यक ती कार्यवाही करुन नागरिकांना अधिकाधिक सुविधा देण्याचा प्रयत्न नगरपरिषद प्रशासनाचा राहील, असा सकारात्मक प्रतिसाद मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे. यावेळी नगरसेवकांनी प्रभागातील समस्या मांडल्या.



पुणे - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक मा. श्री. संजय भोकरे साहेब यांना ६ जानेवारी रोजी दर्पण दिनाच्या शुभेच्छा देऊन दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राच्या दिनदर्शिकेचे विमोचन करताना संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव जगदेवी विवेक स्वामी.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना सवलतीच्या कलागुणांच्या प्रस्तावांसाठी मुदतवाढ

प्रतिनिधी @ बीड

राज्यातील शालांत प्रमाणपत्र फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना कलागुणांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलतीच्या गुणांच्या प्रस्तावांसाठी यंदा विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. त्यानुसार आता शाळांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत कलागुणांचे प्रस्ताव सादर करता येणार आहेत.

राज्य मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी याबाबत परिपत्रकाद्वारे राज्यातील सर्व विभागीय मंडळांना सूचना दिल्या आहेत. शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य

(उर्वरीत पान २ वर)

# गेवराई उपनगराध्यक्षपदी सौ. रेवतीताई घुबार्डे

## तर आबासाहेब काकडे, मुन्ना मोटे यांची स्वीकृत सदस्यपदी निवड



बदामराव पंडित,बाळराजे पवारांनी दिली धनगर समाजाला संधी

प्रतिनिधी @ गेवराई

गेवराई नगर परिषदेवर राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व भाजप नेते बाळराजे पवार यांच्या नेतृत्वाखाली गेवराई नगर परिषदेत भाजपने एकहाती सत्ता मिळवली. नगराध्यक्षपदी सौ गीताभाभी बाळराजे पवार यांची मोठ्या मताधिक्याने निवड

(उर्वरीत पान २ वर)

# माजलगावमध्ये दहशतवाद विरोधी पथकाची कारवाई

## दोघे ताब्यात, चौघांवर गुन्हा लातूरचे कनेक्शन उघड पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांची माहिती

प्रतिनिधी । बीड

छत्रपती संभाजीनगर : अहिल्यानगरच्या फैजान ए-कन्झूल इमान या ट्रस्टचा नोंदणी क्रमांक वापरून गुलजार ए-रझा ट्रस्टच्या नावाने लातूरमध्ये पाच वेगवेगळी खाते उघडून धार्मिक कामाच्या नावाखाली चार कोटी ७३ लाख ६७ हजार ५०३ रुपयांचा निधी जमा करण्यात आला. संबंधित रक्कम स्वत:च्या फायद्यासाठी वापरण्यात आल्याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरच्या दहशतवाद विरोधी पथकाने बीड जिल्ह्यातील माजलगाव शहराजवळील पात्रुड गावात गुरुवारी सायंकाळी ४.३० च्या सुमारास छापा मारून दोघांना ताब्यात घेतले. तर चार जणांविरुद्ध माजलगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईबाबत बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दुजोरा दिला आहे.

इमरान कलीम शेख (सदर बाजार, अंबाजोगाई), मुज्म्मिल नूर सय्यद (सत्तार गल्ली पात्रुड), अहमदुद्दीन कैसर काझी (रोजा मोहल्ला, केज) व तौफीक जावेद काझी, अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. यातील मुज्म्मिल नूर व अहमदुद्दीन काझी या दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या संदर्भाने मिळालेल्या माहितीनुसार वरील आरोपींनी पात्रुडमध्ये गुलजार ए रझा या नावाच्या ट्रस्टचा फलक लावला होता.

(उर्वरीत पान २ वर)





शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6 x 6.5

संपादकीय....

# डिजिटल रणधुमाळी- नवे 'अल्गोरिदम'

महाराष्ट्रातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराने रणांगण बदलले असून, आता खरी लढाई प्रत्यक्ष जमिनीपेक्षा 'डिजिटल स्पेस'मध्ये अधिक तीव्रतेने लढली जात आहे. 'शक्तीप्रदर्शना'कडून 'तंत्रज्ञाना'कडे झालेला हा प्रवास लोकशाहीच्या प्रक्रियेत एक क्रांती घेऊन आला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात महानगरपालिका निवडणुकांकडे 'मिनी विधानसभा' म्हणून पाहिले जाते. आजवर या निवडणुकांचे स्वरूप गल्लीबोळातील चुरस, भिंतींवरील चुना आणि रंगाने माखलेले पोस्टर्स, रिक्षावरचे कर्कश भोंगे आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांनी गाजणाऱ्या या निवडणुका आता पूर्णपणे 'हायटेक' झाल्या आहेत. मात्र, २०२६ च्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या निवडणुकांनी प्रचाराची सर्व जुनी समीकरणे मोडीत काढली आहेत. यंदाची ही लढाई केवळ सत्तेची नसून ती 'डेटा' आणि 'तंत्रज्ञानाची' बनली आहे. प्रत्यक्ष रणांगणापेक्षा सोशल मीडियाच्या आभासी विश्वात सुरू असलेली ही 'डिजिटल रणधुमाळी' लोकशाहीच्या प्रक्रियेत एक नवे वळण घेऊन आली आहे. बदलत्या काळाची बदलती निवडणूक भारतातील लोकशाहीचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः महानगरपालिकांच्या निवडणुका आता केवळ गल्लीतील राजकारण उरलेल्या नाहीत. हे या डिजिटल प्रचार प्रक्रियेतून दिसून येते.

पारंपरिक प्रचार ते डिजिटल प्रचार-

काही वर्षांपूर्वीपर्यंत रिक्षावर लाऊडस्पीकर लावून होणारा प्रचार आणि झेंडे-बॅनरवर उमेदवारांचा भर असायचा. मात्र, आता काळ बदलला आहे. व्हॉट्सप स्टेटसपासून ते यूट्यूब शॉर्ट्सपर्यंत प्रत्येक प्लॅटफॉर्मवर प्रचाराची चढाओढ पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, केवळ मोठ्या नेत्यांच्या सभाच नव्हे, तर गल्ली-गल्लीत वा कोपऱ्यावर असलेल्या सभांचेही आता 'लाईव्ह स्ट्रीमिंग' केले जात आहे, ज्यामुळे प्रभागातील प्रत्येक मतदाराला घरबसल्या उमेदवाराचे विचार ऐकता येत आहेत. प्रचाराचा बदललेला पोत

काही वर्षांपूर्वीपर्यंत निवडणुकीची चाहूल ही शहरात लागणाऱ्या मोठ्या होर्डिंग्सवरून लागत असे. 'ताई, माई, अक्का, विचार करा पक्का' किंवा 'आमच्या प्रभागाचा विकास, हाच आमचा ध्यास' अशा घोषणांनी वातावरण निर्मिती केली जात असे. मात्र, आजच्या काळात मतदारांचे लक्ष भिंतींकडे कमी आणि हातातील पाच इंची मोबाईल स्क्रीनकडे जास्त आहे. त्यामुळेच उमेदवारांनी आपली रसद आता सोशल मीडियाच्या रणांगणावर वळवली आहे.

पूर्वी पदयात्रांमध्ये हजारोंची गर्दी जमवणे हे शक्तीचे प्रतीक मानले जाई. आता फेसबुक लाईव्हला मिळणारे 'व्ह्यूज' आणि इन्स्टाग्राम रीलला मिळणारे 'लाईक्स' यावरून उमेदवाराची लोकप्रियता मोजली जात आहे. 'मतदार राजा जागा हो' म्हणण्यापेक्षा 'मतदार राजा मोबाईल उघड' अशी ही स्थिती आहे.

प्रचाराची नवी अस्त्रे :

यंदाच्या निवडणुकीत उमेदवारांनी प्रचारासाठी काही खास तांत्रिक साधनांचा अवलंब केला आहे त्यामुळे एक घरबसल्या लोकांना झट की पट गोष्टी समजतात. त्यामध्ये-

एआय आणि डेटा सायन्स- यंदाच्या निवडणुकीचे सर्वात मोठे आकर्षण ठरले आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता' अर्थात - ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश चा वापर जास्त होत आहे.

वैयक्तिकृत संपर्क एआयच्या मदतीने उमेदवार आता मतदारांना त्यांच्या नावाने वैयक्तिकृत मेसेज किंवा कॉल करत आहेत. जेव्हा मतदाराला स्वतःच्या नावाने खास रेकॉर्ड केलेला उमेदवाराचा संदेश ऐकू येतो, तेव्हा त्याला आपलेपणाची जाणीव होते.

व्हर्च्युअल अवतार- अनेक उमेदवार प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, तिथे त्यांचे 'एआय अवतार' संवादाची धुरा सांभाळत आहेत.डेटा आधारित रणनीती- मतदार यादीतील डेटाचे विश्लेषण करून कोणत्या भागातील लोकांचे काय प्रश्न आहेत, हे आता संगणकीय प्रणालीद्वारे शोधले जात आहेत. उदा. जर एखाद्या वस्तीत पाणीटंचाई असेल, तर त्या भागातील मतदारांना केवळ पाणीप्रश्नावर भाष्य करणाऱ्या जाहिरातीच सोशल मीडियावर दाखवल्या जात आहेत.

# राष्ट्रीय युवा दिना निमित्त जिल्ह्यातील पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी नागापुरकर सभागृह,योगेश्वरी महाविद्यालय परिसर परळी रोड,अंबाजोगाई येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

यामध्ये राजयोग मोटार्स बीड येथे १) सुपरवायजर एकूण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा-१८ ते २५ जॉब लोकेशन- बीड. २) मेकॅनिक एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल आय.टी.आय इलेक्ट्रॉनिक वयोमर्यादा-१८ ते २५ ३) हेल्पर- एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल एल आय सी बीड, येथे १) विमा सखी एकूण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४० जॉब लोकेशन-बीड गोविंदाज प्रा.लिमिटेड नाशिक येथे ट्रेनी या पदाची एकुण पदे-५० शैक्षणिक पात्रता- १२ वी/ पदवी वयोमर्यादा- १८ ते ३५ जॉब लोकेशन- छ.संभाजी नगर/बीड/पुणे ब्रिजयोग टोयोटा बीड १) सुपरवायजर/ सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह एकूण पदे-३८ शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी वयोमर्यादा-१८ ते ३० जॉब लोकेशन-बीड/परभणी/धाराशिव बजाज टो लि.संभाजीनगर १) डि.टी.ई. एकूण पदे-१०० शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/पदवी वयोमर्यादा-१८ ते २५ जॉब लोकेशन- पुणे टाटा इन्शुरन्स बीड येथे इन्शुरन्स डवायजर/ बिजनेस असोसिएट-एकुण पदे-२५ शैक्षणिक पात्रता - वयोमर्यादा १८ ते ४० जॉब लोकेशन- बीड. श्री.सहयोग मल्टीस्टेट को.ऑप येथे १.गटविकास अधिकारी - या पदाची एकुण पदे -१० शैक्षणिक पात्रता- कोणत्याही शाखेचा पदवीधर वयोमर्यादा- २१ ते ३० जॉब लोकेशन - बीड २.व्यवसाय विकास कार्यकारी -या पदाची एकुण पदे -०५ शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेचा पदवीधर वयोमर्यादा- २१ ते ३० जॉब लोकेशन - बीड ३.रिलेशनशिप ऑफिसर- या पदाची एकुण पदे ०३ शैक्षणिक पात्रता- ग्रॅज्युएट/पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा (एम.सी.ए) वयोमर्यादा २१ ते ३० गोविंद कार्स अंबाजोगाई १.टेलीकॉलर- या पदाची एकुण पदे- ०४ शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते २५ जॉब लोकेशन - बीड/अंबाजोगाई २. मेकॅनिक- या पदाची एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते २५ जॉब लोकेशन - बीड/अंबाजोगाई टाटा मोटार्स बीड येथे १.सेल्स इक्झिक्यटिव्ह- या पदाची एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते २५ जॉब लोकेशन - बीड/अंबाजोगाई मारुती सुझुकी बीड येथे टेक्नेशिअन/सेल्समन/ ऑपरेटर - या पदाची एकुण पदे-३० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३० जॉब लोकेशन - बीड/अंबाजोगाई एस.जी.सॉफ्टवेअर सोल्युशन बीड येथे १.मार्केट डेव्हलपमेंट अधिकारी- या पदाची एकुण पदे १० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३० जॉब लोकेशन - बीड. आयकॉन ब्रॉडबॅन्ड सर्व्हिसेस बीड १.ग्राहक सेवा केंद्र मदतनिस/ कॉम्प्टयुटर ऑपरेटर/इंटरनेट ब्रॉडबॅन्ड मार्केटिंग मॅनेजर एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३० जॉब लोकेशन - बीड.टि.व्हि.एस.संदिप अंबाजोगाई येथे सेल्समन/मॅकनिक- एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३० जॉब लोकेशन - अंबाजोगाई कॉर्नर स्टोन टोमाबाईल अंबाजोगाई येथे सेल्समन/मॅकनिक- एकुण पदे-१० शैक्षणिक पात्रता-१२ वी/पदवी वयोमर्यादा- १८ ते ३० जॉब लोकेशन - अंबाजोगाई जि.आय.एस.इंडिया पुणे येथे ट्रेनी या पदाची एकुण पदे-२०० शैक्षणिक पात्रता- १२ वी/ डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग/ कोणत्याही शाखेचा पदवीधर वयोमर्यादा- १८ ते २५ जॉब लोकेशन- पुणे यशस्वी ग्रुप पुणे ट्रेनी या पदाची एकुण पदे-२०० शैक्षणिक पात्रता- १२ वी/ डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग/ कोणत्याही शाखेचा पदवीधर वयोमर्यादा- १८ ते २५ जॉब लोकेशन- पुणेराजयोग मोटार्स बीड येथे १) सुपरवायजर एकूण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन मेक.इंजिनिअरिंग डिप्लोमा इन इले.इंजिनिअरिंग वयोमर्यादा-१८ ते २५ जॉब लोकेशन- बीड. २) मेकॅनिक एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल आय.टी.आय इलेक्ट्रॉनिक वयोमर्यादा-१८ ते २५ ३) हेल्पर- एकुण पदे-०४ शैक्षणिक पात्रता- आय.टी.आय इलेक्ट्रीकल एल आय सी बीड, येथे १) विमा सखी एकूण पदे ५० शैक्षणिक पात्रता- १० वी किंवा १२ वी वयोमर्यादा-१८ ते ४५ जॉब लोकेशन-बीड याप्रमाणे रोजगाराच्या संधी पात्रता धारक इच्छुक लाभार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.याचा लाभ संबंधितांनी घ्यावा असे आवाहन



# लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊस तोडणी महामंडळ कागदावरच ठेवणार का - प्रा. सुशीलाताई मोराळे

प्रतिनिधी @ वडवणी

मोठा गाजावाजा करत पुण्यात लोकनेते गोपीनाथराव मुंडे महामंडळाच्या कार्यालयाचे उद्घाटन अजित पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. मात्र या महामंडळाची अवस्था अतिशय वाईट आहे.बजेट नाही अनेक ऊस तोडणी मजुरांचा अपघात होतो परंतु कुठलीही मदत मिळत नाही, जिल्ह्याचे कार्यालय कुठे आहे याचा थांगपत्ता नाही.

डोंगरेवाडी तालुका वडवणी येथील मजूर गणेश डोंगरे यांचा उसाच्या अंगावर उसाची ट्रॉली पडून मृत्यू झाला. दुसऱ्या दोघांपैकी एकाचा पाय गेला दुसऱ्यालाही दुखापत झाली. कारखाना प्रशासनाकडे मदत मागितली तर उडवाउडवीची उत्तर दिली गेली. एमडी चेअरमन भेटत नाहीत. या ऊस तोडणी मजुरांना कुणी वाली नाही अशी फरपट त्यांची झाली. हा भाऊराव बिराजदार कारखाना अजितदादांनी चालवायला घेतला आहे. दादा तुम्ही पालकमंत्री आहात तात्काळ मदत देण्यासाठी तुम्ही कारखाना प्रशासनाला सांगितले पाहिजे नसता आम्हाला कारखाना बंद करावा लागेल असे प्रतिक्रिया ऊस तोडणी मजूर संघटनाच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

थंडी वाऱ्यात मजूर ऊस तोडतात मात्र कुठलेही संरक्षण त्यांना दिले जात नाही. धनंजय मुंडे सामाजिक न्याय मंत्री असताना इमेजेस संरक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यांनी अनेक चांगले निर्णय घेतले होते मात्र ते लाल फितीत अडकले आहेत. महाराष्ट्र राज्य ऊस तोडणी मजूर संघटनेचे महासचिव म्हणून मी पण चांगल्या सुधारणा सुचवल्या होत्या मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. कारखाना प्रशासनाने थोडी तरी माणुसकी जपली पाहिजे मयत डोंगरेंचे कारखान्यावर गेले परंतु प्रशासनाने उडवा उडवीची उत्तरे दिली अजित दादा तुम्ही पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यातील मयत मजूर आहे. त्यामुळे तुमची जबाबदारी मोठी आहे तात्काळ माहित डोंगरे कुटुंबाला मदत करावी असे आव्हान पत्रकात प्रा. सुशीला ताई मोराळे यांनी केले आहे.

# धर्माबाद शहराला शुध्द पाणी पुरवठासाठी ७१ कोटी रुपयांची निधी उपलब्ध

## नगराध्यक्षा सौ. संगिताताई बोल्लमवाड यांच्या शुभहस्ते उद्घाटन

धर्माबाद ( अशोक पडोळे ) शहरातील पाणीपुरवठ्याची जुन्नी पाईप लाईन गेल्या ५० ते ६० वर्षीपूर्वीची असल्यामुळे ती जिर्ण झाल्यामुळे शहरातील जनतेला गेल्या अनेक वर्षांपासून दूशित पाणीपुरवठा होत होता. त्यामुळे शहरातील जनतेला पिण्यासाठी शुध्द पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी गोर गरीब जनतेला आर्थिक संकटासमोर जावे लागत आहे. परंतु महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत योजेनेतून शहरातील जनतेला शुध्द पाणीपुरवठासाठी शासनाकडून ७१ कोटी रुपयांची निधी उपलब्ध झाली होती. सदरील योजनेच्या कामाचे उद्घाटन नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. संगिताताई शंकर बोल्लमवाड यांच्या शुभहस्ते अंगारकी चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले आहे.



सदरील योजनेचा पाठपुरावा माजी नगराध्यक्ष स्वर्गीय विनायकराव कुलकर्णी यांनी सन २०१५ मध्ये सुरू केला होता. त्यानंतर सन २०१६ मध्ये नगरपरिषदची सार्वत्रिक निवडणूक झाली व त्या वेळेस थेट नगराध्यक्ष होण्याचा बहुमान काँग्रेसचे श्रीमती अफजल बेगम अब्दुल सत्तार यांना मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वात जास्त नगरसेवक निवडून आले होते. भाजपाचे त्यावेळेस ४ नगरसेवक निवडून आले. व काही काँग्रेसचे नगरसेवक तर काही इतर नगरसेवक निवडून आल्यामुळे अंदाजित दोन वर्षाचा कार्यकाळ सुरळीत पार पडला. त्यांनतर नगरसेवकांच्या अंतर्गत वादामुळे शहराचा विकास रखडला होता. तसेच सदरील योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे तात्कालीन मुख्याधिकारी व पाणीपुरवठा अभियंता तसेच कर्मचाऱ्यांनी शासन स्तरावर पाठपुरावा सुरूच ठेवला होता. सदरील पाणीपुरवठ्याची योजना मंजूर व्हावे, यासाठी. सदरील योजना शासन स्तरावर मंजूर करून घेण्यासाठी आमदार राजेश पवार यांचे सहकार्य लाभले होते. सदरील योजनेच्या कामाचे शुभारंभ मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष शंकर अण्णा बोल्लमवाड यांनी निवडणूक होताच करण्याचे आश्वासन प्रचारादरम्यान दिले होते. ज्या भागात पाण्याची टंचाई आहे. त्या भागातूनच कामाचे सुरूवात करण्याचे आश्वासन शंकर अण्णा बोल्लमवाड यांनी जनतेला दिले होते. शहरातील जनतेनी नगरपरिषदेच्या निवडणुकीत मराठवाडा जनहित पार्टीवर विश्वास दाखविला आहे. त्यामुळे सदरील ७१ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे शुभारंभ अंगारकी चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर नगराध्यक्षा सौ. संगिताताई शंकर बोल्लमवाड यांनी सुरू केल्यामुळे रामनगर परीसरातील जनतेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. व सदरील योजनेच्या कामाचे शुभारंभ होताच शहरातील जनतेनी मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष शंकर अण्णा बोल्लमवाड यांच्या कार्याचे कौतुक करीत आहेत. सदरील पाणीपुरवठा योजनेचे काम अंदाजित दिड वर्षात पूर्ण करण्याचे बंधनकारक आहे .त्या कामाच्या आदेशात असून प्रत्येक व्यक्तीला दररोज १३५ लीटर शुध्द पाणीपुरवठा होणार आहे. सदरील योजनेचे काम शहरातील गल्लीबोळातून ९५ किलोमीटर पाईप लाईन होणार आहे. धर्माबाद शहराच्या इतिहासात आजपर्यंत ऐवढा निधी उपलब्ध झाला नाही. या ऐतिहासिक निधीचे विल्हेवाट योग्य पध्दतीने व योजेनेचे काम दर्जेदार होणार असल्याचे नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. संगिताताई शंकर बोल्लमवाड यांनी शुभारंभप्रसंगी सांगितले आहे. सदरील योजनेतील पाईपलाइनला पुढील ५० वर्ष कुठला धक्का लागणार नाही. त्यामुळे शहरातील जनतेला अंदाजित दिड वर्षानंतर पिण्यासाठी शुध्द पाणी मिळणार असल्याचे चित्र दिसत आहेत. यावेळी मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष शंकर अण्णा बोल्लमवाड, नगराध्यक्षा सौ. संगिताताई शंकर बोल्लमवाड, माजी उपनगराध्यक्ष देविदास बिपटवार, नगरसेवक कृष्णा तिम्मापुरे, गटनेता ताहेर पठाण,समीर भाई, ईज्जू भाई,अलीमोद्दीन चौधरी, सतिष उशलवार, सुदर्शन गुर्जेलवाड,सुलताना बेगम, सौ. सुरकूटवार, सौ. शोभा आईटवार, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी किशनराव सोनकांबळे, गंगाधर सुर्यवंशी यांच्यासह मराठवाडा जनहित पार्टीचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्ते तसेच नागरीक व महीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

**माजलगावमध्ये दहशतवाद ...**

निती आयोगाच्या नियमानुसार ट्रस्टची नोंदणी दर्पण पोर्टलवर करणे आवश्यक आहे. मात्र, गुलजार ए रझाचे चुकीच्या पद्धतीने नोंदणी केल्याचे कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये आढळून आले.

या न्यासाच्या नावाने लातूरमधील ॲक्सिस बँकेमध्ये पाच बोगस खाते तयार करण्यात आले होते. त्यामध्ये चार कोटी रुपये जमा करण्यात आले होते. हा निधी धार्मिक कामाच्या संदर्भाने जमा करण्यात येत असल्याची माहिती आहे. गुलजार ए रझाची बीड जिल्ह्यातील ११ ही तालुक्यांमधील दुय्यम निबंधक कार्यालयांकडून माहिती घेतली असता तेथेही त्यांची नोंदणी आढळून आली नाही.

महाराष्ट्रामध्ये कोणत्याही ट्रस्ट किंवा संस्थेने त्यांची डीड नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे करणे आवश्यक आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडूनही वरील ट्रस्टची माहिती घेतली असता त्यांच्याकडे नोंदणी नसल्याचे कळवले आहे असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ज्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे तो इम्रान शेख हा गुलजार ए रझा ट्रस्टचा अध्यक्ष, सय्यद मुज्जम्मिल हा उपाध्यक्ष, असमदुद्दीन कैसर काझी हा सचिव तर तौफीक काझी याचा विश्वस्त म्हणून बँकेच्या खात्यांमध्ये नोंदणी असल्याची माहिती पुढे आली आहे.

**बीड शहरातील....**

मागण्या मांडण्यात आल्या. निवेदनात पुढे म्हटले की, प्रामुख्याने नागरिकांना दोन ते तीन दिवसाआड नियमित पाणी पुरवठा कसा करता येईल, याबाबत नियोजन करावे. काडीवडगाव व माजलगाव बॅक वॉटर येथे सोलार सिस्टीम बसवून वीजबिलाचा खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच, काडीवडगाव-ईट बीड पाईपलाईनवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. बिंदुसरा धरणावरून धानोरा रोड मार्गे नवीन पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. सर्व प्रभागांमध्ये घंटागाड्या नियमित व नियोजनबद्धपणे फिरतात की नाही, यावर नियंत्रण ठेवावे. घंटागाड्यांवर जीपीएस ट्रॅकर बसवून त्या सध्या कोणत्या भागात आहेत, याची माहिती नागरिकांना मिळेल, अशी व्यवस्था करावी. तसेच नवीन घंटागाड्या, कॉम्पॅक्टर व जेसीबी खरेदी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. शहरातील छोट्या चौकाचौकात मिनी हायमास्ट बसवावेत. नवीन पथदिवे बसवून बंद किंवा नादुरुस्त असलेले पथदिवे तातडीने सुरू करावेत. नगर परिषद कार्यालयावर सोलार सिस्टीम बसवावी आणि मोठ्या चौकांतील हायमास्ट दिवे नियमितपणे सुरू ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. शहरातील सर्व मालमत्तांची नोंद नगर परिषदेच्या रेकॉर्डमध्ये घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करावी, जेणेकरून नगर परिषदेच्या महसुलात वाढ होईल. तसेच, पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल योजनेचे नवीन प्रस्ताव

पान १ वरून...

मंजूर करावेत. तसेच ज्यांना घरे मंजूर झाली आहेत, त्यांचे पुढील हप्ते तातडीने वितरित करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. बीड शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक पार्किंगची सुविधा निर्माण करावी. दर चतुर्थीला वेळेवर सायरन वाजवण्यात यावा. तसेच, बिंदुसरा नदी सुशोभिकरणाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशीही मागणी केली आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित या सर्व नागरी सुविधा तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी निवेदनात केली आहे. या मागण्यांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

**दहावीच्या विद्यार्थ्यांना ..**

मिळवणाऱ्या, लोककला प्रकारांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात. या कलागुणांसाठीचे प्रस्ताव इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यासाठी १५ डिसेंबर अखेर, तर माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १५ जानेवारी होती.मात्र, शासकीय रेखाकला परीक्षेचा (एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ग्रेड) निकाल जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला आणि लोककलांसाठीचे प्रस्ताव विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी या वर्षापूरती मुदत वाढ देण्यात आली आहे.तरी संबंधित इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित शाळेकडे प्रस्ताव दाखल करावेत असे आवाहन शिक्षण व करियर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

**गेवराई उपनगराध्यक्षपदी ....**

झाल्यानंतर, उपनगराध्यक्षपदी सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांना संधी देण्यात आली आहे. तर स्वीकृत सदस्य पदी आबासाहेब काकडे आणि मुन्ना मोटे या दोघांची वर्णी लागली आहे. आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला नगर परिषदेमध्ये प्रतिनिधित्व दिल्याने माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे धनगर समाज बांधवांनी आभार मानले.

गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांची मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक झाली. यावेळी भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजप नेते बाळराजे पवार यांच्या सूचनेवरून, प्रभाग क्रमांक ५ मधून विजयी झालेल्या भाजपच्या सौ रेवतीताई भगवान घुबार्डे यांची उपनगराध्यक्षपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. त्यासोबतच भाजपचे आबासाहेब अंकुशराव काकडे आणि मुन्ना भैया मोटे यांची स्वीकृत नगर सेवक पदी बिनविरोध निवड करण्यात आली. गेवराई नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे एकनिष्ठ सहकारी माजी

पान १ वरून...

नगरसेवक अंकुशराव काकडे यांचे चिरंजीव आबासाहेब अंकुशराव काकडे यांच्या माध्यमातून घनगर समाजाला संधी देण्यासाठी त्यांचा नावाची शिफारस केली. त्यास भाजपा नेते बाळराजे पवार यांनीही तात्काळ पाठिंबा दिला. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार या दोन्ही नेत्याच्या सामंजस्यपणामुळे आता गेवराई नगर परिषद सभागृहात विविध समाजाला नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व मिळाले आहे.

मुन्ना मोटे यांच्या रूपाने मराठा तर आबासाहेब काकडे यांच्या रूपाने धनगर समाजाला सत्तेत सहभागी करून काम करण्याची संधी दिल्याबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांचे सर्व समाज बांधवांकडून आभार व्यक्त करण्यात येत आहेत. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा भाजप नेते बाळराजे पवार, जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, युवानेते रोहित पंडित, युवानेते शिवराज पवार आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भाजपा गटनेते ड राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्यासह सर्व नगरसेवक भाजप पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. निवडीनंतर गुलाल उधळून, ढोलीबाजा वाजवत कार्यकर्त्यांनी प्रचंड जल्लोष केला.

# महात्मा फुले युवा दल शिरूर तालुका प्रमुखपदी राजेश कातखडे यांची निवड

प्रतिनिधी @ शिरूर कासार



महात्मा फुले युवा दलाच्या शिरूर तालुका प्रमुखपदी गोमळवाडा येथील राजेश कातखडे यांची निवड करण्यात आली आहे. महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतिश शिंदे यांच्या आदेशावरून व बीड जिल्हा प्रमुख अजय शिंदे यांनी आज बुधवार रोजी शिरूर तालुका प्रमुखपदी राजेश कातखडे यांची निवड करण्यात आली आहे.

या निवडीमुळे शिरूर तालुक्यातील माळी समाजाच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहे अशी ग्वाही राजेश कातखडे यांनी दिली आहे. ते पत्रकारीतेच्या माध्यमातून शेतकर्यांचे प्रश्न, सामाचाचे प्रश्न निर्भयप्रमाणे मांडत असतात, त्यामुळे शिरूर तालुक्यातील माळी समाजाच्या हक्कासाठी लढा देणार्या कार्याला नवी दिशा मिळेल अशी आशा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या निवडीबद्दल महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे व जिल्हाप्रमुख अजय शिंदे व शिरूर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.



# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने दै. जगमित्र कार्यालयात दर्पणदिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ परळी

परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतिने दै. जगमित्रचे मुख्य संपादक बालासाहेब कडबाने यांच्या प्रमुख मार्ग दर्शनाखाली दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी परळी शहरातील जो थंडी आसो की पाऊस आश्या वातावरणात भल्या पहाट पासुन वृतपत्र वितरणा साठी जिवाचे रान करतात आश्या वितरकांचा बाळासाहेब काटे, रामेश्वर पोळ, बाळु जोशी, उमाकांत खरबड, गवळी आदिंचा राष्ट्रवादी कॉग्रेसचे मा. शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते सत्कार करून त्यांचा सन्मान केला गेला. त्याच वेळी परळी शहरातील बेवारस सापडलेल्या मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कारा पर्यत जे पोलिसांच्या मदतीला रात्री बे रात्री धावुन जातात असे शिवाजी लांडगे यांचा ही विषेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना वृतपत्र वितरकांसाठी जमिनचे हस्तांतर करून नपच्या माध्यमातुन घरकुल बांधुन देण्याचे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी आश्वासन दिले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे शिवसेना , मा. उपनगराध्यक्ष आभय कुमार ठक्कर, प्रा. आतुल दुबे सर, दै. परळी प्रहारचे राजेश साबणे, शिवसेनेचे रमेश चौंडे मनोज संकाये यांची उपस्थिती होती तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले, शहराध्यक्ष रंगनाथ सावजी, कार्याध्यक्ष सुमित गिरी, सचिव मोहन चव्हाण, नितीन जाधव याच्यासह पत्रकार संघाचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आभार प्रदर्शन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रल्हाद कंडुकटले यांनी केले.

**जाहीर प्रगटन**
**मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात**
**(एस एस परिहार यांचे समक्ष)**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २७०/२०२५**
**विमलबाई आणि ई. व्ही. निरंक**
**मार्क – ए ६ पु.ता. १७/०२/२०२६**

**अर्जदार :–**
**१. विमलबाई संजय कारके, वय ४९ धंदा घरकाम**
**२. यशवंत संजय कारके, वय २५ धंदा शेती**
**३. आदित्य संजय कारके, वय २४ भंदा शेती**
**सर्व रा. अण्णाभाऊ साठेनगर अंबड, ता. अंबड जि. जालना**
**–: विरुद्ध :–**
**गैर–अर्जदार:– निरंक**
**विषय:– मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. के एन शर्मा यांचेमार्फत सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदाचे कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला असून सदरील अर्जानुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारा आहे. तसेच मयत संजय वामनराव कारके यांची अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ ही मयताची मुले आहेत. तसेच संजय वामनराव कारके यांचा दि. ०५/०९/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदारांशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत संजय वामनराव कारके यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच विज जोडणी, तसेच नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभग कार्यालय, तहसील कार्यालय नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भुमी अभीलेख कार्यालय अशा सरकारी कार्यालयातील नोंदी हया वारसांने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत यांचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नाही, म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ०८.०१.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(आर.एन. राठोड)**
**विभाग लिपीक**

**आदेशान्वये,**
**अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर,**
**अंबड जि.जालना**



# शालेय विद्यार्थ्यांना मिळाले कृषी शिक्षण

## पुणे बिझनेस स्कूलचा पुढाकार 'कृषिशास्त्र' हँडबुक दिले भेट

प्रतिनिधी @ बीड

पुणे येथील झउएढ़ी पुणे बिझनेस स्कूलमध्ये झत्रऊत्व– –इच् (ॲग्रिबिझनेस मॅनेजमेंट) चे शिक्षण घेणारे विद्यार्थी शुभम रामदास तिडके यांनी ताडसोन्ना येथील जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन शालेय विद्यार्थ्यांना कृषीशास्त्राविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील मूलभूत संकल्पना व आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.

ग्रामीण भागातील शाळांच्या अभ्यासक्रमात कृषी विषयाचा समावेश मर्यादित असल्याने, पुणे बिझनेस स्कूलच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेले 'कृषिशास्त्र' हे विशेष हँडबुक शाळेला भेट स्वरूपात देण्यात आले. या हँडबुकच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शेती, पीक व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञान तसेच कृषी क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक संतोष पडुळे सर, आंधळे सर व जोशी मॅडम उपस्थित होते.पुणे बिझनेस स्कूलचे प्राचार्य सागर लोखंडे, संचालक गणेश राव तसेच प्राचार्या डॉ. मीनाक्षी त्यागी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आला.

# वंजारवाडी येथील सावरकरच्या ग्रंथोत्सवात रासेयो स्वयंसेवकांची आगळीवेगळी छाप, ग्रंथदिंडीने दुमदुमला परिसर !

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा २०२६ आणि राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा घडवून आणला मिलाप

प्रतिनिधी @ बीड

**येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या ग्रंथालया मार्फत विस्तारसेवा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना शिबिरा मध्ये मातोश्री माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वंजारवडी येथे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांना घेवून वाचन संकल्प महाराष्ट्राचा निमित्त ग्रंथोत्सवा मध्ये विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले.**

ग्रंथ दिंडी काढण्यात आली यात वाचना संबंधी घोषवाक्ये , ग्रंथ, संविधान, डोल, टाळ, मृदुंग, लेझीम, भगवा ध्वज आणि ग्रंथ दिंडी गीत गात शालेय विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.प्रमुख अतिथी गौरी डावखरे, मुख्याध्यापक बी डी नागरगोजे आणि रासेयो च्या कार्यक्रमाधिकारी यांच्या उपस्थितीत ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

वाचन कौशल्य कार्यशाळेत ' मी काय वाचावे ? आणि कसे वाचावे ?' याविषयावर प्रमुख वक्त्या गौरी डावखरे, शिक्षिका, स्वा. सावरकर मा. विद्यालय, बीड यांनी सखोल मार्गदर्शन केले. या प्रसंगी वाचनाचे प्रकार, कसे वाचावे त्याचे फायदे आणि वाचनाचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखवले आणि घेतले. ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी पाहुण्यांचा परिचय आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ग्रंथप्रदर्शन, वाचन, अशा विविध उपक्रमांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरित केले. मुख्याध्यापक



श्री नागरगोजे बी. डी. म्हणाले की अशा प्रकारच्या उपक्रमांमधून स्वयंसेवक घडतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा उपक्रमातून वाचनास नक्कीच प्रोत्साहन मिळेल अशी आशा व्यक्त करून त्यांनी महाविद्यालयाचे उपक्रमा बद्दल कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. दीपा देशपांडे यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाचा वसा घेऊन जीवन समृद्ध करावे असे नमूद केले. डॉ. स्वाती कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.नंदिनी रुईकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वयंसेवक बनसोडे ज्ञानेश्वर, पांचाळ शुभम, जोगदंड रितेश, ठोकळ हिमेश, तरटे पंकज, चौरे अनिल, मोतुळे प्रेम, नंदिनी रुईकर, कल्याणी भोसले ,वैष्णवी यादव ,माया, किरण बेदरे, प्रियंका बारे यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवला. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. सुहास मोराळे व दोन्ही उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हानकर व डॉ.उत्तम साळवे यांनी उपक्रमास भेट देवून समाधान व्यक्त केले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभाग अधिकारी प्रा. राजपाल जाधव, प्रा. दीपा देशपांडे, प्रा. राम गव्हाणे, सदस्य डॉ. स्वाती कुलकर्णी, डॉ. गंगाधर उष्यमवार, डॉ. छत्रपती पांगारकर, उपस्थित होते. मातोश्री शाळेचे मुख्याध्यापक नागरगोजे बी. डी., भुतकर के.ए., जाधव जे.एस., आंधळे आर.बी., डोंगरे व्ही.एस., तांदळे एल. पी., बेग जे. के., घरत एन. एस. जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका डोंगरे मंगल, शिक्षक राहुल सुपेकर व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर ग्रंथोत्सव ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांच्या मार्गदर्शनाने पार पडला. या प्रसंगी सचिन चौरे, बाळासाहेब वाघमारे आणि प्रसाद पांडे यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई येथील श्री आर.ए.मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७७२/२०२५**
ओमप्रकाश जनार्धन भांडेकर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.एस.के.निकम गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **जनार्धन पि.विष्णुपंत भांडेकर हे दि.०२.०४.२०२५ रोजी गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.ओमप्रकाश जनार्धन भांडेकर, वय–६५ वर्षे, धंदा–वकिली, रा.१५६८ जुना मोंढा संपदा पतसंस्था जवळ, पैठण ता.पैठण जि.औरंगाबाद, २. दिलीपकुमार पि.जनार्धन भांडेकर वय–६२ वर्षे, धंदा–व्यापार, रा.समर्थ शिक्षक कॉलनी, जायकवाडी मागे, गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांनी सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा गेवराई ता.गेवराई जि.बीड | ६२२०४६०२७८६ | रु.६४१४२.२२ /– अक्षरी चौसष्ट हजार एकशे बेचाळीस रूपये व २२ पैसे व त्यावरील व्याज |

वरील रक्कम मिळणे कामी अर्जदार यांना उत्तराशिकार प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जनार्धन पि.विष्णुपंत भांडेकर** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०७/०२/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–११७८ दि.२५.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अंगद बाबासाहेब मोताळे रा.वडीकाळ्या ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | युवराज अंगद मोताळे | मुलगा | १२.०३.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– १६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–११७७ दि.२६.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अंगद बाबासाहेब मोताळे रा.वडीकाळ्या ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिवराज अंगद मोताळे | मुलगा | २९.०८.२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**कार्यालय नगरपंचायत तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी**
**स्पष्ट देखावा**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार : सुरेखा ज्ञानेश्वर मडके रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांनी गट नं.(–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.प. कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ३९७९ क्षेत्र २०९९.५९ चौ.फु. पैकी १०५० चौ.फु. जागा नामे योगेश बाबुराव गर्जे रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर खरेदीखत खरेदीखत दस्त क्र. ६६६४/२०२५ दि. ११/१२/२०२५ अन्वये खरेदी केली आहे.

खरेदी खरेदीखत सत्य प्रत जोडुन आवक क्र. (३३७१) दिनांक २६/१२/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेंव्हा योगेश बाबुराव गर्जे रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेले गट नं.(–) सिटी सर्वे नं. (–) ग्रा.प. कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ३९७९ क्षेत्र २०९९.५९ चौ.फु. पैकी १०५० चौ.फु. म्हणजेच ९७.५८ चौ.मी. ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : चांडक कुटुंबाची जागा
पश्चिम : खरेदीदार यांची जागा
दक्षिण : रस्ता
उत्तर द्या : अमृत मिठूलाल सारडा

या वरील चतुःसिमा मधील क्षेत्र ९७.५८ चौ. मी. जागा खरेदीखत पत्रा आधारे नामांतर करणे बाबत काही उजर / आक्षेप/ तक्रार असल्यास सदर जाहिरप्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचे काहीही म्हणने नाही. असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत मुख्याधिकारी**
**नगर पंचायत तीर्थपुरी**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७/२०२६**
कमलबाई भ्र.जिजाबा काळे व इतर वि.निरंक
**(मार्फत–ॲड.एल.जी.कुलकर्णी, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **जिजाभाऊ पि.बाबाजी काळे, रा.राजापुर ता.गेवराई जि.बीड हे दि.०४.०८.२०१९ रोजी राजापुर ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.कमलबाई भ्र.जिजाभाऊ काळे, वय–६७ वर्षे, धंदा–घरकाम, रा.राजापुर ता.गेवराई जि.बीड, २. बापुसाहेब पि.राजाभाऊ काळे वय–४६ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ३. कोंडीराम पि.जिजाभाऊ काळे वय–४३ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर, ४. सतिश पि.जिजाभाऊ काळे वय–४० वर्षे, धंदा–शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जिजाभाऊ पि.बाबाजी काळे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०७/०१/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१७/०२/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४/२०२६**
ज्ञानदेव पि.नारायण ढवान वि.निरंक
**(मार्फत–ॲड.एच.एस.पाटील, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **सुंदराबाई भ्र.लक्ष्मण ढवान, रा.आगरनांदुर ता.गेवराई जि.बीड हे दि.०४.०३.२००९ रोजी आगरनांदुर ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **ज्ञानदेव पि.नारायण ढवान, वय–७० वर्षे, धंदा–शेती, रा.आगरनांदुर ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **सुंदराबाई भ्र.लक्ष्मण ढवान** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०७/०१/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१६/०२/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०३९/२०२५**
अशोक पि.मच्छिंद्र जाधव विरुध्द निरंक
**(मार्फत–ॲड.कोळेकर आर.ए.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मीबाई भ्र.मच्छिंद्र जाधव हे दि.०८.०५.२००९ रोजी निपाणी जवळका ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.अशोक पि.मच्छिंद्र जाधव वय–४२ वर्षे, धंदा–शेती, रा.निपाणी जवळका ता.गेवराई जि.बीड, २. आदिनाथ पि.मच्छिंद्र जाधव वय–४१ वर्षे, धंदा–शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लक्ष्मीबाई भ्र.मच्छिंद्र जाधव** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२२/१२/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –२७/०१/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री रविंद्र अ.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०५७/२०२५**
सत्यवती एकनाथ सवासे विरुध्द निरंक
**(मार्फत–ॲड.कोळेकर आर.ए.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **सीताराम पि.सखाराम काकडे हे दि.१३.१०.२००७ रोजी मौजे निपाणी जवळका ता.गेवरवाई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. सत्यवती एकनाथ सवासे, वय–७२ वर्षे, धंदा–शेती, रा.निपाणी जवळका ता.गेवराई जि.बीड** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **सीताराम पि.सखाराम काकडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२४/१२/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०२/०२/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# नवगाव येथील विवाहिता खून प्रकरणी सासू-सासऱ्यांचा जामीन अर्ज पैठण सत्र न्यायालयाने फेटाळला

## आरोपपत्र दाखल झाल्यानंतरही दिलासा नाही, हत्या व कट रचण्याचे गंभीर आरोप कायम

प्रतिनिधी @ जालना



पैठण तालुक्यातील नवगाव येथे विवाहिता फातेमा सिद्दीक खान यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात महत्त्वपूर्ण वळण आले असून मयत विवाहितेच्या सासू व सासऱ्यांनी आरोपपत्र दाखल झाल्यानंतर सादर केलेला जामीन अर्ज पैठण सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे.या निर्णयामुळे आरोपींना मोठा धक्का बसला आहे.

दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी नवगाव येथील विवाहित महिला फातेमा सिद्दीक खान हिचा मृत्यू झाला होता.सुरुवातीला सासरच्या मंडळींनी ही आत्महत्या असल्याची माहिती दिल्याने पोलिसांनी आत्महत्येचा गुन्हा दाखल केला होता.मात्र पुढील सखोल पोलीस तपास साक्षीदारांचे जबाब तसेच प्रथम व अंतिम वैद्यकीय अहवाल यांच्या आधारे हा मृत्यू आत्महत्या नसून पूर्वनियोजित हत्या असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सदरील गुन्ह्यात गंभीर कलमांची वाढ करून खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला.

या प्रकरणात एकूण पाच आरोपी असून ते गेल्या चार महिन्यांपासून कारागृहात आहेत. यापूर्वी चार आरोपींनी पैठण सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता तो फेटाळण्यात आला होता.तसेच पाच पैकी तीन आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी धाव घेतली होती मात्र उच्च न्यायालयानेही त्यांचा अर्ज नामंजूर केला होता.मयत फातेमा पठाण हिचा विवाह २०१७ साली जालना येथील सिद्दीक ईलियास पठाण यांच्याशी रीतिरिवाजाप्रमाणे झाला होता.लग्नानंतर सासरच्या मंडळींकडून नवऱ्याने मेडिकल दुकान टाकण्यासाठी ११ लाख रुपयांची मागणी करण्यात येत होती. ही रक्कम घेऊन येण्यासाठी फातेमाला वारंवार मारहाण करून मानसिक व शारीरिक छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप आहे.दरम्यान फातेमाला तिच्या पती सिद्दीक पठाण व जाऊ रुखैय्या ईदरीस पठाण यांच्यात अनैतिक संबंध असल्याचे समजले होते. याबाबत जाब विचारल्यावर फातेमावरचा छळ अधिक तीव्र करण्यात आला.या अत्याचाराबाबत फातेमाच्या माहेरच्या मंडळींनी नवगाव येथे अनेक वेळा बैठकाही घेतल्या व सासरच्यांना समजावण्याचा प्रयत्न केला.मात्र मुलांच्या भवितव्याच्या आशेने आणि परिस्थिती सुधारेल या विश्वासावर फातेमा सासरी नांदत राहिली.मात्र पैशांची मागणी पूर्ण न झाल्याने तसेच फातेमा ही पती व जाऊ यांच्या अनैतिक संबंधात अडसर ठरत असल्याने सर्व आरोपींनी संगनमत करून कट रचून फातेमाची हत्या केल्याचा आरोप तिचा भाऊ शाकेर खान पठाण यांनी फिर्यादीत केला आहे.

या प्रकरणात आरोपी सिद्दीक ईलियास पठाण (पती), ईदरीस ईलियास पठाण (दीर), ईलियास अहमद पठाण (सासरा), राझिया बी ईलियास पठाण (सासू), रुखैय्या ईदरीस पठाण (जाऊ) यांच्यावर भारतीय न्यायसंहिता कलम १०३ हत्या, ६१(०२) (कट रचणे) व २३८ पुरावे नष्ट करणे अंतर्गत गुन्हा दाखल आहे.आरोपपत्र दाखल झाल्यानंतर सासरा ईलियास अहमद पठाण व सासू राझियाबी ईलियास पठाण यांनी पैठण सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र गुन्ह्याचे स्वरूप, उपलब्ध पुरावे व तपासाची गंभीरता लक्षात घेऊन न्यायालयाने हा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पी.बी. यादव करीत असून या खून प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

# क्रिकेट स्पर्धेतून दर्जेदार खेळाडू घडावेत : डॉ.योगेश क्षीरसागर


## आंतरमहाविद्यालयीन बीड झोन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी @ बीड



क्रीडा स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडू घडून विद्यापीठाचा सक्षम संघ तयार होतो आणि त्यातून बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढतो. खेळाडूंना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, शहरालगत अद्ययावत मैदान निर्माण करणे, क्रिकेटसाठी आवश्यक साहित्य पुरवून कौशल्यपूर्ण खेळाडू घडवण्यासाठी विविध ठिकाणी संधी उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच, क्रिकेट स्पर्धेतून दर्जेदार खेळाडू घडावेत, असे प्रतिपादन भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व बीड शहरातील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन बीड झोन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन डॉ. योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या हस्ते गुरुवारी संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर होते. अध्यक्षीय भाषणात डॉ.क्षीरसागर म्हणाले, महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कार्य अतिशय उत्कृष्ट दर्जाचे असून खेळाडूंनी सातत्याने महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला आहे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी सरपंच नाना शेंडगे, डॉ. संतोष वनगुजरे (क्रीडा मंडळ सदस्य), डॉ. भारत पल्लेवाल, डॉ. तत्तापुरे, पंच अक्षय नरवडे, शिदोडचे माजी सरपंच चंद्रसेन शेंडगे, डॉ.शेख शकील, संतोष वाघमारे, डॉ.दत्ता पुरे, पल्लेवाड, वनगुजरे, सुशील शिंदे, जय गायकवाड, समीर काटकर, संतोष वाघमारे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.भागचंद सानप यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. शकील, डॉ. घोडके, डॉ. नवले यांनी परिश्रम घेतले. या क्रिकेट स्पर्धेत बीड जिल्ह्यातील विविध संघ सहभागी झाले असून परिसरातील खेळाडू व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. कार्यक्रमाचे आभार डॉ. सोनाजी गायकवाड यांनी मानले. दरम्यान, दि. ८ जानेवारी ते १४ जानेवारी २०२६ या कालावधीत ही आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा कवठेकर क्रिकेट मैदान, शिदोड येथे होत आहे.



बीड प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील मौजे शिवणी येथील युवा नेते श्री. विजय सुपेकर, सरपंच श्री. अजय सुपेकर, ग्रामपंचायत सदस्य राधाबाई अभिमान सानप , ग्रामपंचायत सदस्य नितेताई सूर्यवंशी , बबन डोळस यांनी आमदार श्री. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.पक्षप्रवेश प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अशोक हिंगे, तालुकाध्यक्ष ड.राजेंद्र राऊत, भाऊसाहेब डावकर, रमेश चव्हाण, सरपंच तेजाब चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

# आत्माराम वाव्हळ यांना 'लोकरत्न पुरस्कार' प्रदान

प्रतिनिधी @ बीड

दर्पण दिनाचे औचित्य साधून लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'लोकरत्न पुरस्कार' पत्रकार तथा बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांना मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दर्पण दिनी बीड शहरातील सोमेश्वर मंदिर येथे आयोजित भव्य-दिव्य समारंभात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, बीड नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे, पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारोती खेडकर, प्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ. रमेश घोडके, डॉ उर्मिला घोडके, सामाजिक कार्यकर्त्या सीमा ओस्तवाल, मयुरी बांगर, निलाफर शेख मॅडम, तसेच प्रतापराव साळुंके, नवनाथ अण्णा शिराळे आणि भागवत वैद्य, यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करून त्यांच्या गौरव करण्यात आला.



# बोरगाव बु येथे स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच भरला बाजार गावांसह परीसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी @ जाफराबाद

जाफराबाद तालुक्यातील विदर्भ-मराठवाडा सिमेवरील बोरगाव बु या गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच बुधवारी आठवडी बाजाराची सुरवात करुन एका नव्या इतिहासाला सुरवात करण्यात आली आहे.आठवडी बाजारासाठी ग्रामस्थांना पायपीट करीत जाफराबाद , माहोरा, खासगाव व बुलढाणा जिल्ह्यातील चांडोळ, येथे बाजाराला जावे लागत होते. तेथून भाजीपाला, किरकोळ वस्तू आणाव्या लागत. सकाळी निघालेली व्यक्ती सरळ रात्रीच घरी पोहोचत असे. परिणामी अख्खा दिवसच नागरिकांचा वाया जात होता. ही बाब लक्षात घेता गावातच आठवडी बाजार भरला तर नागरिकांचा वेळ आणि पैशाची बचत होऊ शकते, यावर विचारमंथन होऊन आठवडी बाजार भरविण्याबाबत एकमत झाले. त्यानुसार बोरगाव बु येथे स्वातंत्र्य नंतर पहिल्यांदाच बुधवारी आठवडी बाजार भरला.

बोरगाव बु या गावातील नागरिकांना कोणतेही काम करायचे असल्यास नागरिकांना ६ ते १० किमी अंतर जावे लागते असे. त्यातच भाजीपाला किंवा अन्य किरकोळ खरेदी म्हटले की नागरिकांना त्रासदायक होते. ही बाब लक्षात घेता गावकऱ्यांनी गावात आठवडी बाजार भरविण्याबाबत चर्चा केली. त्यानुसार आठवडी बाजार भरविण्यावर एकमत होऊन बुधवारी (दि. ७ जाने) आठवडी बाजार भरविला.यानिमित्त भाजीपाला विक्रेत्यांसह अन्य विक्रेत्यांचे बोरगाव बु येथील गावकऱ्यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले.हा बाजार आता दर बुधवारी बोरगाव बु येथे भरणार आहे. त्यामुळे नागरिकांना गावातच भाजीपाला आणि अन्य किरकोळ साधने खरेदी करता येणार असून ग्रामस्थांची पायपीट थांबली आहे.या बाजाराचा बोरगावसह बोरगाव मठ, बोरी,हिवराबळी, बोरगाव वाडी,जानेफळ, शिंदी या गावासह विदर्भातील इरला येथीलही नागरिकांना बोरगाव बु येथील आठवडे बाजाराचा फायदा होणार आहे.

# प्रख्यात कवी इंद्रजित भालेराव यांचे सोमवारी व्याख्यान

## राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी @ बीड

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने नामवंत मराठी कवी तथा 'ग्रामीण कवी' म्हणून परिचित इंद्रजित भालेराव यांचे विशेष व्याख्यान सोमवार, दिनांक १२ रोजी दुपारी १.०० वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, येथे आयोजित करण्यात आले आहे.

राजमाता जिजाऊ यांनी दिलेले संस्कार, राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे मोलाचे योगदान आणि सामाजिक जाणीव यांचा संदर्भ घेत साहित्य व संस्कृतीविषयी सखोल मांडणी या व्याख्यानातून करण्यात येणार आहे. ग्रामीण जीवन, मातीशी नाते तसेच सामान्य माणसाच्या भावविश्वाचे प्रभावी चित्रण करणाऱ्या इंद्रजित भालेराव यांच्या कवितांना मराठी साहित्यविश्वात विशेष मान आहे.

या विशेष व्याख्यानाला विद्यार्थी, शिक्षक, साहित्यप्रेमी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने करण्यात आले आहे.

# अतिवृष्टीग्रस्तांना तात्काळ मदत द्या, मनरेगामध्ये भेदभाव थांबवा

## शासकीय अधिकारी कोणाचेही बाहुले बनू नयेत, अन्यथा तीव्र आंदोलन - माजी आ.भीमराव धोंडे, माजी आ.बाळासाहेब आजबे यांचा इशारा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा मतदार संघातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही नुकसानभरपाई मिळालेली नाही. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) होणाऱ्या कामांमध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून भेदभाव केला जात असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार भीमराव धोंडे व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी केला आहे. हा भेदभाव कोणाच्यातरी सांगण्यावरून होत असल्याचा संशय असून, शासकीय अधिकारी व कर्मचारी कोणाच्याही दबावाखाली काम करत असतील तर ते सहन केले जाणार नाही. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणाचेही बाहुले बनू नये, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

आष्टी तहसील कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या भव्य धरणे आंदोलनात ते बोलत होते. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते भाऊसाहेब लटपटे यांनी आष्टी विधानसभा मतदार संघातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर गंभीर चिंता व्यक्त केली. मतदार संघात कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले होत असून, त्यामागे कोण आहेत याचा पोलीस प्रशासनाने शोध घ्यावा असे सांगितले. मात्र, पोलिसांकडून आरोपींवर गुन्हे दाखल केले जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. या सर्व प्रकरणांबाबत उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची लवकरच शिष्टमंडळासह भेट घेऊन सविस्तर निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या काही महिन्यांपूर्वी आष्टी मतदार संघातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टी झाल्याने शेती, रस्ते, बंधारे आदींचे मोठ्या







प्रमाणात नुकसान झाले. शासनाकडून पंचनामे करण्यात आले असले तरी शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. पंचनामे झाले, पण पैसा कुठे आहे? असा सवाल उपस्थित करत दोन्ही माजी आमदारांनी प्रशासनाच्या दिरंगाईवर टीका केली.

मनरेगांतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक स्वरूपाची अनेक कामे प्रलंबित आहेत. विशेषतः ज्या विहिरींचे जिओ-टॅगिंग पूर्ण झाले होते, त्यांची मान्यता अचानक रद्द करण्यात आली आहे. अशा सर्व कामांना तातडीने मान्यता देऊन कामे सुरू करावीत, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली. यावेळी प्रमुख मागण्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानभरपाई द्यावी. खराब झालेले रस्ते व बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करावी. मनरेगांतर्गत रखडलेली सर्व कामे त्वरित सुरू करावीत. जिओ-टॅगिंग होऊनही रद्द झालेल्या विहिरींना पुन्हा प्रशासकीय मान्यता द्यावी ह्या होत्या.

या आंदोलनावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आष्टी तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, पाटोदा तालुकाध्यक्ष दीपकदादा घुमरे, शिरूर कासार तालुकाध्यक्ष विश्वास नागरगोजे, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथदादा वनवे, माजी शिक्षण सभापती नियमत बेग, युवा नेते अजयराजे धोंडे, अभयराजे धोंडे, धैर्यशील थोरवे, यशभैय्या आजबे, महेश आजबे, ड. भाऊसाहेब लटपटे, आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे, युवक तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले, नामदेव शेळके, शेख अस्ताक भाई, श्याम भैय्या हुले, आदिनाथ बेलेकर, दिलीपराव काळे, अशोक खेळकर, ड. रत्नदीप निकाळजे, ड. संभाजी दहातोंडे, राजपाल शेंडगे, संभाजी जगताप, बबनराव औटे, अभिलाष गाडेकर पाटील, गोकुळ सवासे, गणेश मोहोळकर, दिगंबर नाईकनवरे, आनंद घुमरे, कृष्णा मिसाळ, आदेश निमोणकर, संभाजी जगताप, पांडुरंग गावडे, अनिल बडे, उद्धव शिरसाठ, जालिंदर गायकवाड नेते, बाबा ससाणे, गौतम ससाणे, हरिभाऊ जंजिरे, सुदाम काका झिंजुर्के, बजरंग कर्डिले, अंकुशराव मुंडे, वैभव बडे, शेख नइम, राहुल शेळके, फैजल शेख, शेख हादी, सनी काळपुंड, नितीन निकाळजे, सदाशिव दिंडे, सुनिल शिंदे, केदार जगताप, वसीम शेख, सावळेराम जायभाये, अशोक खेडकर, बापूराव जाधव, झुंबर चव्हाण, जालिंदर देवकर, सरपंच भरत जाधव, सरपंच माऊली वाघ, सरपंच संजयदादा विधाते, बापूराव आव्हाड, संजय नालकोल, हरिभाऊ दहातोंडे, डॉ. सुनील गाडे, ताराचंद कानडे, डॉ. संतोष कदम, संजय चंदनशिव, बबनराव काकडे, चंद्रशेखर साके यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, सरपंच, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धरणे आंदोलनादरम्यान आंदोलकांचे निवेदन स्वीकारण्यासाठी तहसीलदार वैशाली पाटील, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने आणि जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता शिनगारे यांनी भेट दिली. सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून तातडीने प्रश्न सोडविण्यात येतील, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# यात्रा, जत्रा आणि जुन्या आठवणींचा भावनिक उजाळा

## पत्रकार व ८५ वर्षीय आजोबांच्या संवादातून उलगडले ग्रामीण संस्कृतीचे सुवर्णपान

आष्टी (राजेंद्र लाड)

शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या सण, उत्सव, यात्रा-जत्रा आणि त्यामागील धार्मिक, सांस्कृतिक परंपरा आजच्या धावपळीच्या युगात हळूहळू विस्मरणात जात आहेत. मात्र या परंपरांचे जिवंत साक्षीदार असलेले ८० ते १०० वयोगटातील ज्येष्ठ नागरिक हा खऱ्या अर्थाने समाजाचा अमूल्य ठेवा आहेत. अशाच एका ८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाशी संवाद साधण्याचे आणि त्यांच्या आठवणी टिपण्याचे भाग्य पत्रकार उत्तम बोडखे यांना लाभले.

आष्टी तालुक्यातील खंडोबा यात्रेच्या निमित्ताने हा विशेष प्रसंग घडला. अत्यंत हसतमुख चेहऱ्याने, ताजेतवाने मन आणि निरोगी शरीराने



यात्रेचा आनंद घेत असलेले पांडुरंग सखाराम बोडखे (वय ८५) यांच्याशी पत्रकार बोडखे यांनी जाणीवपूर्वक संवाद साधला. या संवादात जुन्या काळातील यात्रा-जत्रांचे स्वरूप, त्यातील कुस्त्यांच्या स्पर्धा, तमाशे, लहान मुलांसाठी असलेली खेळणी, तसेच यात्रेसाठी वर्षभर मनात जपून ठेवलेली हुरहूर आणि जमवलेले पैसे या साऱ्या आठवणी त्यांनी अत्यंत भावूक शब्दांत सांगितल्या. त्या काळातील सण-उत्सव केवळ करमणुकीपुरते मर्यादित नसून, समाजाला एकत्र आणणारे, माणसांमधील नाते घट्ट करणारे होते, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या आठवणी ऐकताना उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले.

८५ वर्षांनंतरही इतकी उत्तम तब्येत कशी टिकवली, असे विचारले असता त्यांनी यामागील गुपितही उलगडले. चांगले आणि सकस अन्न, व्यसनांपासून दूर राहणे, नियमित श्रम, शेतीतील कष्ट आणि साधी जीवनशैली यामुळेच दीर्घायुष्य लाभले, असे त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे पांडुरंग बोडखे हे आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कड्याचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी. पी. बोडखे यांचे वडील आहेत. यात्रेदरम्यान अनेक पत्रकार बांधवांनी त्यांची आपुलकीने चौकशी केली आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला. या भेटीतून काही क्षणांसाठी ते पुन्हा आपल्या तरुणपणात रमले. खंडोबा यात्रेतील हा अनुभव केवळ एक संवाद नव्हता, तर तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्ये हस्तांतरित होण्याचा भावनिक क्षण ठरला.

# युवा शास्त्रज्ञ रणजित राऊत यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श प्राणी मित्र पुरस्कार

आष्टी (राजेंद्र लाड)

जामखेड तालुक्यातील फक्राबाद येथील संशोधक विद्यार्थी व युवा शास्त्रज्ञ रणजित रावसाहेब राऊत यांना शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे भगवान महाविद्यालय, आष्टी यांच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी कला रौप्य महोत्सव २०२५-२०२६ अंतर्गत राज्यस्तरीय आदर्श प्राणी मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार दि. १ जानेवारी २०२६ रोजी माजी आ. भीमराव धोंडे व सौ. दमयंतीताई धोंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



या कार्यक्रमास शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे, युवानेते अभयराजे धोंडे, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, प्रशासकीय अधिकारी डी. बी. राऊत, भगवान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके आदी मान्यवर उपस्थित होते. सध्या रणजित राऊत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्राणीशास्त्र विभागात संशोधक विद्यार्थी म्हणून कार्यरत असून, जैवविविधता संवर्धन, प्राणी संरक्षण, मानव - वन्यजीव संघर्ष निवारण, पर्यावरणीय जनजागृती व सामाजिक स्तरावर प्राणी कल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांना हा सन्मान मिळाला आहे.या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. एम. व्ही. कानेटकर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख व पीएच. डी. मार्गदर्शक डॉ. जी. डी. सूर्यवंशी, तसेच उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. विश्वास चव्हाण, प्रा. डॉ. बबन इंगोले, प्रा. डॉ. अनिल कुऱ्हे, प्रा. डॉ. जे. डी. शेख, प्रा. डॉ. राम चव्हाण, प्रा. डॉ. रुपेंद्र भागडे, प्रा. डॉ. ए. एम. भोसले, प्रा. डॉ. व्ही. बी. साखरे, प्रा. डॉ. सोमनाथ वाघमारे, प्रा. डॉ. बी. ए. पवार, प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, प्रा. डॉ. संतोष रणखांब, प्रा. डॉ. नितीन पडवळ, प्राचार्य डॉ. पी. एम. दिघे आदींनी त्यांचे अभिनंदन केले. शैक्षणिक, सामाजिक, संशोधन व पर्यावरण क्षेत्रातून रणजित राऊत यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून या पुरस्काराकडे पाहिले जात आहे.

# उजाड माळरानावर फुलले नंदनवन: गव्हाणे दांपत्याच्या सेंद्रिय भोपळ्याला पाच राज्यांत मागणी

आष्टी (राजेंद्र लाड)

आष्टी तालुक्यातील कानडी खुर्द (मेहेकरी) येथील शेतकरी नानासाहेब गव्हाणे व श्रीम. मंदाकिनी गव्हाणे या कष्टकरी दांपत्याने उजाड, मुरमाड व नापीक माळरानावर सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून नंदनवन फुलवून यशाची नवी कहाणी लिहिली आहे. जिथे कुसळही उगवत नाही अशा जमिनीत त्यांनी भोपळा पिकवून केवळ परिसरातच नव्हे, तर पश्चिम बंगाल, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश व राजस्थान या पाच राज्यांत आपली ओळख निर्माण केली आहे.



गेल्या २४ वर्षांपासून गव्हाणे दांपत्य आपल्या घरीच निंबोळी अर्क तयार करून सेंद्रिय पद्धतीने शेती करत आहे. वर्षातून तीन वेळा भोपळा पीक घेऊन ते कमी खर्चात आणि कमी कालावधीत अधिक उत्पादन मिळवत आहेत. त्यांच्या एकूण १२ एकर शेतीपैकी २ एकर क्षेत्रात ८ ह्न २ अंतरावर भोपळ्याची लागवड केली जाते. यामधून एकरी १५ ते २० टन उत्पादन घेतले जाते. परिणामी, वर्षाकाठी त्यांना ६ ते ७ लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळते.

आजच्या काळात रासायनिक फवारण्या व कृत्रिम खतांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येते. मात्र, गव्हाणे कुटुंब पूर्णतः सेंद्रिय शेती करत असल्याने त्यांच्या उत्पादनामुळे शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही, असे ते ठामपणे सांगतात. याच कारणामुळे त्यांच्या भोपळ्याला विशेष मागणी असून हलवा, पेठा, भाजी व गोड पदार्थांसाठी मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.

दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी नानासाहेब गव्हाणे यांनी मेहेकरी येथे भोपळा पिकाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्याला आष्टी तालुक्यातील ३५ गावांमधून ३५० शेतकरी व ७० महिला उपस्थित होत्या. त्यांनी शेतकऱ्यांना आधुनिक व सेंद्रिय शेती पद्धती स्वीकारून उत्पन्न कसे वाढवता येईल, याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी श्रीम. मंदाकिनी गव्हाणे आपल्या शालेय आठवणी सांगताना म्हणाल्या, शाळेत असताना मला काही विषयांत 'भोपळा मार्क' पडायचे; पण आज याच भोपळ्याच्या शेतीने मी उजाड माळरानावर सोनं पिकवलं आहे. त्यांच्या या शब्दांनी उपस्थित शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता आधुनिक तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती व नव्या कल्पनांचा वापर केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो, असे गव्हाणे दांपत्य ठामपणे सांगते. शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणा कमी होऊन आत्महत्यांचे प्रमाण थांबावे, यासाठी अशा यशोगाथा प्रेरणादायी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# जाफराबाद शहरातील मंदिर-मशीद धार्मिक ऐक्याचे प्रतिक

जाफराबाद /हरी भालके

शहराच्या मध्यभागी असलेले बालाजी मंदिर आणि शहा शरीफ मशीद समाजाले जोडणारे धागे जाफराबाद तालुका महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील जाफराबाद है एक लहान शहर असले, तरी येथील धार्मिक एकतेची परंपदा त्याला एक वेगळेच नीरेपण मिळवून देते. या शहाच्या मध्यभागी उसे असलेले बालाजी मंदिर आणि लहा कदरीफ मशीद हिंदू-मुस्लिम समाजाच्या शतकानुशतके चालत आलेल्या एकोप्याचे एक जिवंत प्रतीक आहेत

सलोख्याची एक अनोखी कहाणी: एका वाजूला

गवसणी घालणारे बालानी मंदिराचे शिखर तर दुसऱ्या बाजूला दिमाखाने उभे असलेले शहा शरीफ मशिदीचे घुमट है दृश्य भालीष संस्कृतीतील विविधतेत एकता हा मृतमेव अधोरेखित करते. ही दोन्ही धार्मिक स्थळे केवळ उपासनेची केंद्रे नसून, ती एकमेकांनी आदर, सन्मान शि स्वैतादांचे प्रतीक आहेत विशेष मागाने, त्यांचे अंता जवळ २५० मोटर असले तरी त्यांच्या सायकल्या जणू एकमेकांत मिसळून या ऐक्याला निसगांनी जोड देतान



जाफराबादमधील लोक सांगतात की येथे धर्मामध्ये कधीच भिंत उभी राहिली नाही. एका रहिवाशाचे बोलके शब्द यासाठी पुरेसे आहेत आ आमच्यासाठी मंदिर-मशीद या दोन वेगळ्या इमारती नाहीत, तर त्या समाजाला केडणारेचा आहेत, सण असो वा उम्म आमही सगळे एकत्र येतो.खिम्ती, बैद्ध आणि जैन समाजाचे नागरिकही परिवृतिक कोचा भाग आहेत. यामुळे जाफराबाद केवळ दोन्य धर्मांचे नव्हे तर चहुविध संस्कृतचे बनले आहे इतिहासाचा वारसा आणि आजचा संदेश इतिहास बंगले की जाफराबाद नेहमीच एक राहिले आहे. विविध पंचांचे आणि केंदजातीचे लोक पेथे स्थायिक झाले आणि एकत्र राहण्याची परंपरानिर्माण झाली मंदिर आणि मशीद आहो नही या परंपरेचे साक्ष देत आहेत. जगभरात जिथे धार्मिक मिळतात, तिथे फराबाद हंत आणि बंधुतेचे उदाहरण जपून आहे. हे शहर आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी आदर्श अकराबादचे हे अद्वितीय दृश्य केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे. धर्म वेगळा असला तरी एचला हीच खरी ओळया' हा संदेश बालाजी मंदिर आणि शहा शरीफ मशिदीच्या महअस्तित्वातून स्पष्ट दिसती आफराबादचे हे जिवंत उदाहरण आाफल्याला सांगते की ऐक्या हेच राष्ट्राचे खरे सामर्थ्य आहे एकत्र राहण्याची शिकवण देते मंदिरात जाणारा का मशिदीकडे आदराने पाहले आगि मशिदीत जाणारा मुस्लिम महिराच्या घंटेच्या आजा सन्मान करती हीच खरी भारतीयता आहे.



## आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली वटणवाडीत ५१ लाडक्या बहिणींची मोफत केवायसी

आष्टी - (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील वटणवाडी येथे युवा सामाजिक कार्यकर्ते किरण भगवानराव शिनगिरे यांच्या संकल्पनेतून आणि मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी दोन दिवसीय केवायसी कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पमध्ये गावातील ५१ पात्र महिलांची मोफत केवायसी यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाणार आहे. सध्या सुगीचे दिवस सुरू असल्याने महिला शेतकामात व्यस्त असतात. शहरात जाऊन केवायसी करण्याचा त्रास, वेळ आणि खर्च टाळण्यासाठी किरण शिनगिरे यांनी गावातच कॅम्प आयोजित केला. या माध्यमातून महिलांना योजनेबाबत सविस्तर माहिती देऊन त्यांची ऑनलाईन केवायसी करून देण्यात आली. या उपक्रमासाठी श्रीम. प्रभाताई वायकर, संतोष वायकर, बळीराम शिनगिरे, प्रवीण शिनगिरे, महेश शिनगिरे आणि कार्तिक येवले यांनी सहकार्य केले. या सामाजिक उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# ना.पंकजाताई मुंडे शनिवारी गहिनीनाथ गडावर

प्रतिनिधी @ बीड

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे उद्या (ता. १०) शनिवारी गहिनीनाथ गडावर येणार आहेत. थोर संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यास त्या उपस्थित राहणार आहेत. वारकरी संप्रदायातील थोर संत वै. वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा १० जानेवारीला गहिनीनाथ गडावर संपन्न होत आहे. यंदाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत. पुण्यतिथीला गडावर येण्याची लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांची परंपरा पंकजाताई मुंडे यांनी देखील पुढे जोपासली असून दरवर्षी त्या दर्शनासाठी गडावर येतात. एक भक्त म्हणून गडावर विविध विकास कामासाठी त्यांनी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी दिला होता. शनिवारी सकाळी ११ वाजता पंकजाताई मुंडे यांचे गडावर आगमन होणार असून दर्शन व कीर्तनाच्या कार्यक्रमास त्या उपस्थित राहणार असल्याचे त्यांच्या संपर्क कार्यालयातून सांगण्यात आले.

# विलासराव देशमुख यांच्याविषयीच्या रवींद्र चव्हाण यांचा वक्तव्याचा जाहीर निषेध - डॉ.प्रतापसिंह पाटील

प्रतिनिधी @ धाराशिव

लातूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात काँग्रेसचे दिवंगत नेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांचे नाव घेऊन करण्यात आलेल्या वक्तव्यावरून राज्यभर तीव्र संताप व्यक्त होत आहे. या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

डॉ. पाटील म्हणाले की, स्वर्गीय विलासराव देशमुख हे महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वमान्य, संयमी आणि विकासाभिमुख नेतृत्व होते. अशा थोर नेत्यांविषयी अशोभनीय वादग्रस्त वक्तव्य करणे हे अत्यंत दुर्दैवी असून सध्याचे राजकारण कोणत्या खालच्या



पातळीवर जात आहे, हे यावरून स्पष्ट होते.

महाराष्ट्राची राजकीय संस्कृती ही सुसंस्कृत, सभ्य आणि विचारप्रधान राहिली आहे. वैचारिक मतभेद असले तरी दिवंगत नेत्यांविषयी आदर राखणे ही परंपरा आहे.त्यामुळे संबंधित वक्तव्याचा जाहीर निषेध करत असल्याचे डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी स्पष्ट केले.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली भारतीय सैन्यदलाची मागणी पूर्ण

## युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांचा पुढाकार

प्रतिनिधी @ उरण

राज्यात सगळीकडे २९ महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच शिवसेनेने मात्र कर्तव्यभावनेचा विसर पडू दिलेला नाही. भारतीय सैन्यदलाने केलेली मागणी पूर्ण करत त्यांना शिवसेनेच्या वतीने ५० कंटेनर देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. यातील ४६ कंटेनर यापूर्वीच सीमेवर रवाना करण्यात आले असून, उर्वरित चार कंटेंनर आज उरणमधून सैन्याच्या हवाली करण्यात आले. युवासनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या उपस्थितीत हे कंटेनर भारतीय सैन्यदलातील अधिकारी सुभेदार सयाजी निगडे आणि नायक सुभेदार आनंद गायकवाड यांच्या हवाली करण्यात आले.

शिवसेनेची सिन्दुर महारक्तदान यात्रा १० ऑगस्ट २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमध्ये गेली होती. त्यावेळी डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्यासह महाराष्ट्रातील हजार पैलवानांनी शिवसेनेच्या माध्यमातून भारतीय सैन्यदलातील जवानांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजित केले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यावेळी या महारक्तदान यात्रेत सहभागी होऊन प्रत्यक्ष रक्तदान केले होते. त्यावेळी भारतीय सैन्य दलातील ब्रिगेडियर युद्धवीर सिंह सीखों यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे सीमेवर तैनात असलेल्या जवानांच्या सुरक्षिततेसाठी कंटेनर उपलब्ध करुन द्यावेत अशी मागणी केली होती.

ऑपरेशन सिन्दुर नंतर भारत-पाकिस्तान सीमारेषेवरील युद्ध तंत्रात बराच फरक पडला आहे. या युद्धादरम्यान आणि आणि नंतरही पाकिस्तानकडून सीमावर्ती भागात ड्रोन हल्ले केले जातात. यावेळी सीमेवर तैनात असलेल्या जवानांना सुरक्षित स्थळी लपायचे असल्यास भूमिगत बंकरमध्ये लपण्यावाचून दुसरा पर्याय नाही. मात्र प्रत्यक्ष सीमारेषेजवळ सिमेंट काँक्रीटचे कायमस्वरूपी बंकर बनवणे अशक्य असल्याने कंटेंनरची मागणी सैन्यदलाकडून करण्यात आली होती. त्याचा वापर करून जलदगतीने बंकर उभारणे शक्य होते तसेच

सैनिक, शस्त्र आणि इतर वस्तू सुरक्षित ठेवता येत असल्याने कंटेनर उपलब्ध करून देण्याची मागणी सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांनी शिंदे यांच्याकडे पत्र लिहून केली होती. या विनंतीला मान देऊन शिवसेनेच्या वतीने ५० कंटेनर भारतीय सैन्य दलाला दिले




आहेत.भारतीय सैन्य दलाने हे कंटेनर स्वखर्चाने सीमावर्ती भागात घेऊन जाण्याची तयारी दर्शविल्याने उरण येथून हे उर्वरित चार कंटेनर सैन्यदलाच्या हवाली करण्यात आले आहेत. केलेल्या विनंतीला मान देत तत्काळ ही मदत उपलब्ध करून दिल्याबद्दल भारतीय सैन्यदलाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिवसेनेचे आभार मानले आहेत. लवकरच सैन्याचे अधिकारी उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन याबाबतचे पत्र शिंदे यांना सुपूर्द करणार असल्याचे बाजीराव चव्हाण यांनी सांगितले आहे.

# आष्टीत श्रीराम कथा सोहळ्यासाठी जय्यत तयारी



## भक्ती, श्रद्धा व अध्यात्माचा जागर

आष्टी (प्रतिनिधी)

आमदार सुरेश धस प्रतिष्ठान यांच्या वतीने आष्टी येथे येत्या ११ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या भव्य श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून साकार होत आहे. या श्रीराम कथेचे निरूपण देवदास स्वामी मठ, दादेगाव येथील परमपूजनीय महंत मंदार महाराज रामदासी करणार आहेत. कार्यक्रमासाठी आष्टी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात १५०×३०० फूटाचा भव्य मंडप, अत्याधुनिक ध्वनिव्यवस्था, आकर्षक प्रकाशयोजना तसेच भाविकांसाठी बसण्याची सुसज्ज आसन व्यवस्था अंतिम टप्प्यात आहे.

सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या असून, स्वागत, शिस्त, प्रसाद वाटप, वाहनतळ व्यवस्था, आरोग्य व स्वच्छता यासह सर्व बाबींचे काटेकोर नियोजन केले जात आहे. कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येला निघणाऱ्या आकर्षक शोभायात्रेची तयारीही जोमात सुरू आहे.

या श्रीराम कथेच्या माध्यमातून आष्टी शहरात भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा जागर होणार असून, भाविकांना भक्ती, उत्साह आणि आध्यात्मिक अनुभूतीचा संगम अनुभवायला मिळणार आहे. दिनांक ११ ते १७ जानेवारी दरम्यान दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ४ या वेळेत श्रीराम कथा होणार आहे. तसेच मकर संक्रांतीच्या दिवशी (१४ जानेवारी) सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष कथा आयोजित करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने आष्टीसह परिसरातील २० ते २५ गावांतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा अंदाज असून, त्या अनुषंगाने सर्व आवश्यक सुविधा पुरविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी आमदार सुरेश धस म्हणाले, श्रीराम कथेच्या माध्यमातून समाजात भक्ती, संस्कार आणि सद्विचारांचा प्रसार व्हावा, हा आमचा उद्देश आहे. सर्व भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. सुरेश धस व मराठवाडा भूषण लोकनेते आ. सुरेश धस प्रतिष्ठानच्या संयोजन समितीने केले आहे.

# पत्रकार समाजाचा आरसा; दुर्बलांचा आवाज – नितीन सरकटे

## तळणी येथे दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान सोहळा



तळणी वार्ताहर : पत्रकाराने एकदा ठरवले, तर तो केवळ बातमी देणारा घटक राहत नाही, तर समाजातील दुर्बलांचा आवाज बनतो आणि सत्तेतील दुर्बल घटकांनाही त्यांची जागा दाखवण्याची ताकद पत्रकारितेत असते, असे प्रतिपादन मंठा ग्रामीण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे चेअरमन नितीन सरकटे यांनी केले.

ते मंठा तालुक्यातील तळणी येथील श्री कृपा हॉस्पिटल येथे डॉ .रवींद्र देशमुख यांनी आयोजित केलेल्या दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन व पत्रकार सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षीय भाषण बोलताना केले.

दुर्बलांपासून 'बिरबलां'पर्यंत घाम फोडण्याची क्षमता पत्रकारात असते. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पत्रकार समाजाचा आरसा म्हणून काम करतो. जनसामान्यांच्या मनातील भावना मांडणे, गोरगरीब, दिनदलित व उपेक्षित घटकांच्या अडचणी शासन-प्रशासनापर्यंत पोहोचवणे आणि त्या सोडवण्यासाठी लेखणीचा ढाल म्हणून वापर करणे, हे महत्त्वाचे कार्य पत्रकार बांधव करत असतात, असे सरकटे यांनी सांगितले.

सत्य, निर्भीडता आणि समाजहिताची बांधिलकी जपत काम करणारे पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून त्यांचे योगदान अमूल्य असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा निःस्वार्थपणे समाजासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांचे आभार मानले तरी ते अपुरेच ठरतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, यावेळी डॉ. रविंद्र देशमुख यांच्या वतीने पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते पेन व डायरीचे वितरण करून सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत भगवानरावजी देशमुख, कानडीचे माजी सरपंच गंगाधर खंदारे, नारायण सरकटे, दारासिंग चंदेल, विशाल देशमुख, शरद खंदारे, अनिल वाघ यांची होती.

सन्मान सोहळ्यासाठी अमोल राऊत (लोकमत), रवि पाटील (दिव्य मराठी), नाना राजपूत (पुण्यनगरी) अरुण राठोड (देशोन्नती), ज्ञानेश्वर येऊल (दै. तरुण भारत) आणि बाळू गायकवाड (दै. नवराष्ट्र) या पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश सरकटे यांनी केले

# शिराढोण बसस्थानक धुराच्या छायेत गेल्याने प्रवाशांचे आरोग्य धोक्यात..!



शिराढोण / बिलाल कुरेशी

शिराढोण येथील एस.टी. बस स्थानक सध्या अक्षरशः धुराच्या छायेत सापडले आहे. जुन्या व देखभालअभावी बसमधून निघणारा काळा धूर, स्थानक परिसरात थांबणाऱ्या प्रवाशांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. बस सुटण्याआधीच संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरतात, त्यामुळे नागरिकांना श्वास घ्यायलाही त्रास सहन करावा लागत आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, महिला व आजारी प्रवासी यांना याचा अधिक फटका बसत असून, डोळ्यांची जळजळ, खोकला, श्वसनाचे त्रास वाढत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. बस स्थानकावर काही वेळ थांबणेही आता प्रवाशांसाठी आव्हान बनले आहे.

दररोज शेकडो प्रवासी या बस स्थानकाचा वापर करतात. मात्र एस.टी. प्रशासनाकडून बसच्या देखभालीकडे होत असलेले दुर्लक्ष आणि प्रदूषणाकडे होणारे दुर्लक्ष चिंतेचा विषय ठरत आहे. प्रवास करायचा की आरोग्य जपायचं? असा सवाल आता प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.

धूर सोडणाऱ्या बसवर तात्काळ कारवाई करा

प्रवाशांचे आरोग्य हेच खरे भांडवल असताना, शिराढोण बस स्थानक धुरमुक्त कधी होणार ? असा सवाल नागरिकांमधून जोर धरू लागला आहे.

# माजी खा. सुधाकर श्रृंगारे यांचा भाजपात प्रवेश




प्रतिनिधी @ लातुर

लातूर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी गुरुवारी भाजपात प्रवेश केला. माजी मंत्री तथा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत श्रृंगारे यांचा पक्षप्रवेश संपन्न झाला.

लातूर लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या तिकीटावर सुधाकर श्रृंगारे हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले होते. यावेळी माजी खा. श्रृंगारे यांची मुलगी सौ. सुप्रिया पायाळ यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला.लातूर शहरातील पाटील प्लाझा येथे भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑलंपियाड परीक्षेत जिजाऊ ज्ञानमंदिर इंग्लिश स्कूलच्या तेरा विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल अवार्ड

प्रतिनिधी @ मुखेड



सन २०१० पासून सातत्याने कार्यरत असलेल्या जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूलने मुखेड शहरातच नव्हे तर पंचक्रोशीत आपल्या शैक्षणिक कार्याचा व विविध स्पर्धा परीक्षेच्या निकालाचा चढता आलेख ठेवत एक वेगळा आदर्शवत ठसा उमटवला आहे. परवाच एसओएफ इंटरनॅशनल इंग्लिश आलंपियाड स्पर्धा परीक्षा २०२५ - २६ चा निकाल हाती आला असून त्यात जिजाऊ ज्ञानमंदिर सेमी इंग्लिश स्कूल मुखेडच्या तेरा विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्यासह गोल्ड मेडल प्राप्त झाले आहेत.

इयता पहिलीतून स्वराज गणपती आगलावे , कु. योगीता सुनिल गायकवाड , कु. अनया मैनोद्दीन शेख , इयता दुसरीतून बालाजी हरिराम शेळके , श्रुती खंडू श्रीमंगले , प्रगती भास्कर तमशेट्टे , इयत्ता तिसरीतून बालाजी मारोती जारीकोटे ' पवन राजू जून्ने , अथर्व बालाजी झिंकवाड इयता चौथीतून अनया इरफान चौधरी , द्रोण यादव गव्हाणे , तहेमीम युसूफ सय्यद , आणि इयत्ता सहावीमधून व्यंकटेश मारोती देवकते आदी तेरा विद्यार्थी गोल्ड मेडल अवार्ड घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.यशस्वी विद्यार्थी हेच या शाळेची खरी कमाई आहे. प्रामाणिक प्रयत्न , जिद्द व सततची धडपड करून शैक्षणिक कार्याबरोबरच आपल्या विद्यार्थ्यामध्ये नैतिक जीवनमुल्ये रुजवून विद्यार्थी सुसंस्कारीत करणारी शाळा म्हणून प्राचार्य जगदीप जोगदंड यांच्या कुशल नेतृत्वाखाली पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड यांच्या सुनियोजित मार्गदर्शनाखाली, तज्ञ मार्गदर्शक अनुभवी शिक्षक, शिक्षिका सायराबानू शेख मॅडम, जोशी मॅडम , सौ. अनिता शिंदे मॅडम , परवीन शेख मॅडम , वडजे मॅडम , अमोल राठोड सर आदींचे विद्यार्थ्यांप्रती असलेले वैयक्तिक लक्ष यामुळेच हे यश मिळाले असल्याचे मत संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड सर व मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर यांनी व्यक्त करून विद्यार्थी व सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे मनस्वी कौतुक व अभिनंदन केले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती अर्थात बालिका दिनाचे औचित्य साधून गोल्डमेडल प्राप्त यशस्वी तेरा विद्यार्थ्यांचा संस्थाध्यक्ष ज्ञानोबा जोगदंड सर व मुख्याध्यापक जगदीप जोगदंड यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे बहारदार असे इंग्लिशमधून सुत्रसंचलन शिवकुमार स्वामी सरांनी केले. या यशाबद्दल पालकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.

# जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज आयोजित रक्तदान शिबिरात ८३ रक्तदात्यांचे रक्तदान

प्रतिनिधी @ कळंब



जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीज धाम महाराष्ट्र यांच्या प्रेरणेने जीवनदान महाकुंभ ( रक्तदान ) २०२६ दिनांक ४ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६ आयोजन करण्यात आले असून तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा हा नरेंद्रचार्यजी महाराजांचा संदेश सदभक्तांना आहे दरवर्षीप्रमाणे पंधरा दिवस चालणाऱ्या महाकुंभा द्वारे विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा उपक्रम संस्थान तर्फे राबविण्यात येत आहे.

यानुसार उपजिल्हा रुग्णालय कळंब येथे ७ जानेवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शिवाजी आप्पा कापसे यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी नगरसेवक अमर चाऊस, डिकसळ ग्रामपंचायत सदस्य इम्रान मुल्ला, विकास कदम, सतीश आडसूळ यांची उपस्थिती होती. रक्तदात्यांना धाराशिव शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ब्लड बँकेच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले , ब्लड बँकेचे कर्मचारी व उपजिल्हा रुग्णालय कळंब स्टाफ यामध्ये डॉ. दीपमाला करंडे रक्तसंक्रमण अधिकारी, लक्ष्मीकांत मुंडे रक्तपेढी तंत्रज्ञ, निलाक्षी जानराव ,दीप्ती बंगले, नामदेव मुंडे, नरसिंग ऑफिसर, स्वप्नील जाधव, गणेश साळुंखे जनसंपर्क अधिकारी, सतीश कांबळे रक्तपेढी परिचर ,रक्तदान प्रमाणपत्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, प्राचार्य जगदीश गवळी, पत्रकार माधवसिंग राजपूत, जयनारायण दरक, यांच्या हस्ते देण्यात आले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज शिष्यगण विठ्ठल काटे, कल्याण बोराडे, जीवन चव्हाण, राजेंद्र मुळीक, दत्तात्रय इंगोले, स्वप्निल खिंडकर, व्हंडे, रमेश शिंदे ,प्रदीप जाधवर, प्रमोद कुलकर्णी, अशोक त्रिमुखे ,अनिता चव्हाण, अनिता विभुते, सुहासिनी काळे, कोमल जाधवर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमात गरजवंत भक्तांना जयनारायण दरक यांच्या वतीने ब्लँकेट, व रक्तदात्यासाठी बिस्किट वाटप करण्यात आले.

# पालकमंत्र्यांचे चहापान, नाष्टा अन् गप्पा गोष्टीने लातूरकरांनी अनुभवले छत्रपती

प्रतिनिधी @ लातुर



छत्रपतींच्या घराण्याविषयी तमाम महाराष्ट्राला नितांत आदर आहे. छत्रपतींना पहायला, भेटायला आणि बोलायला मिळणे हे तर भाग्यच समजल जात. पण गुरुवारी लातूरकरांना वेगळाच अनुभव आला. साक्षात छत्रपती लातूरच्या बाजारपेठेत सामान्य नागरिकांसोबत बसून चहा-पान करताना आणि नाष्ट करताना दिसले. हे दृश्य पाहून लातूरकर हरपून गेले. छत्रपतींसोबत फोटो काढायला, सेल्फी घ्यायला झुंबड उडाली.

गुरुवारी सकाळी सामान्य लातूरकर आपल्या दिनक्रमात व्यस्त होते. सकाळची वेळ असल्याने सर्व हॉटेलांमध्ये नाष्ट्यासाठी गर्दी पडलेली होती. तेवढ्यात शहरातील नामांकित तुळजाई इडली गृहासमोर गाड्यांचा ताफा थांबला. सहाजिकच गर्दीचे लक्ष तिकडे गेले. या वाहनातून जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर आदी मान्यवर उतरले. हे सर्वजण थेट तुळजाई इडलीगृहात दाखल होत असलेले पाहून नागरिकही अचंबित झाले. हॉटेलमध्ये जावून छत्रपतींसह मान्यवरांनी सामान्य नागरिकांसमवेत बसून नाष्टा केला. लातूरकरांच्या हाताची चव छत्रपतींनीही चाखली. सामान्य लातूरकरांशी चर्चाही केली. लातूरकरांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेतल्या. छत्रपतींना पाहून सेल्फी घेण्यासाठी युवकांनी मोठी गर्दीही केली.विविध ठिकाणच्या बैठका आटोपून हे मान्यवर दुपारच्या वेळी न्यायालयाच्या पाठीमागील बाजूस खोरी गल्लीत असणाऱ्या साई टी हाऊस येथे दाखल झाले. तेथे त्यांनी चहापान केले. पालकमंत्री ना. भोसले यांना पाहून हॉटेलमध्ये प्रचंड गर्दी जमा झाली. पालकमंत्री ना. भोसले व आ. संभाजी पाटील यांनी प्रत्येकाशी संवाद साधला. या परिसरात चहापानासाठी येणारे वकील तसेच परिसरातील रहिवाशांनी पालकमत्र्यांसोबत छायाचित्रे काढली.नाव आणि पद मोठे असले तरी छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, आ. संभाजी पाटील निलंगेकर हे सामान्य नागरिकांमध्ये मिसळून वावरत असल्याचे

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन उत्साहात साजरा

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार संपन्न

प्रतिनिधी @ अहमदपुर



अहमदपूर येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील,आचार्य गुरुराज महाराज, माजी मंत्री विनायकराव पाटील, बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, नगराध्यक्ष स्वप्निल व्हते, तहसीलदार उज्वला पांगरकर, गटविकास अधिकारी पंकज शेळके, नगरसेवक हनमंत देवकते, निखिल कासनाळे, प्रतीक रेड्डी, अजिंक्य चामे, संदीप चौधरी, राजकुमार मजगे, सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ब्रिटिशांच्या काळात वृत्तपत्राची स्थापना केली. मराठी आणि इंग्रजीची ते गाडे अभ्यासक होते . आजच्या परिस्थितीत वर्तमानपत्राच्या अनेक बाजू आहेत पत्रकारांनी व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी सुद्धा आपल्या जबाबदारी ओळखून काम केलं पाहिजे. शहरातील पत्रकार सामाजिक बांधिलकी जपत विविध सामाजिक उपक्रम राबवतात हे कौतुकास्पद असल्याचे सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्राध्यापक विश्वंभर स्वामी यांनी केले. यावेळी निखिल कासनाळे, स्वप्निल वत्ते, गणेश हाके बब्रुवान खंदाडे, विनायकराव पाटील , गुरुराज महाराज यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मारुती बुद्रुक पाटील यांनी केले. तर आभार सचिव बाबासाहेब वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमास अहमदपूर शहरातील विविध पक्षाचे नवनिर्वाचित नगरसेवक,पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते

# लिंगापूर ग्रामपंचायत अंतर्गत १५ व्या वित्त मधील दर्जाहीन व निकृष्ट झालेल्या सर्व कामाची

## दलित वस्तीत झालेल्या सिमेंट रस्त्याची तत्काळ चौकशी करून कारवाई करावी

तामसा (प्रतिनिधी)

हदगांव तालुक्यातील ग्रामपंचायत लिंगापूर अंतर्गत पंधराव्या वित्त आयोगातून अनेक नियमबाह्य कामे झाले असून, १५ व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतीने नाली बांधकाम केले असून सदर नालीचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून कुठलेही चांगल्या प्रकारची सिमेंट, गज, वाळू न वापरता व खाली कुठलेही बेड न करता त्यांनी सदर नालीचे काम केले आहे. थातूरमातूर काम करून ग्रामपंचायतची कालावधी संपत असल्यामुळे बिल उचलून घेण्याचा प्रकार सरपंच व ग्रामसेवक करत आहेत. या कामाची सविस्तर पाहणी, चौकशी करण्यात यावी व निकृष्ट व दर्जाहीन झालेल्या संबंधित कामाची बिले देण्यात येऊ नये, अशी मागणी हदगावचे गटविकास अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत सदस्या सौ. इंदुबाई सुरेश कवडे यांनी केली आहे.

लिंगापूर ग्रामपंचायत अंतर्गत नांदेड जिल्हा परिषदच्या दलित वस्ती अंतर्गत सिमेंट रस्त्यासाठी दलित वस्तीमध्ये रस्ता मंजूर होऊनही गावातील सरपंच व ग्रामसेवक यांनी मनमानी करून हा केवळ एक बाजूने दलित वस्ती असून गावातील मुख्य रस्तावर त्यांना हा रस्ता केला, त्यामुळे दलित वस्ती मधले सर्व रस्ते ठेवले आहे, हा दलित समाजावर झालेला अन्याय आहे, मी याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांना वेळोवेळी कामाबाबत सांगूनही त्यांनी दखल घेतली नाही. पंचायत समिती स्तरावरून झालेल्या दोन्ही कामाची योग्य ती चौकशी करावी व संबंधित ग्रामसेवक व सरपंच मनमानी करून व सत्तेचा दुरुपयोग करून जी दर्जाहीन कामे केली आहेत, ती कामे तात्काळ थांबवावी या कामाची चौकशीविना मोजमाप करू नये किंवा देयके देण्याचा प्रकार पंचायत समितीच्या कार्यालयाकडून झाला तर येणार्या २६ जानेवारी रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, अशा इशारा देत निवेदनाची प्रतिलिपी राज्यसभेचे खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांना प्रतिलिपी करत संबंधित कामाची चौकशी करत शासनाचा निधीचा दुरुपयोग करणार्या यंत्रणेवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्या इंदुबाई कवडे यांनी केली आहे.





## राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश संघटक भरत काकडे यांचा भाजपात प्रवेश

नवीन नांदेड (प्रतिनिधी)

कौठा येथील नेहमी सामाजिक चळवळीत अग्रेसर असणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ओबीसी प्रदेश संघटक भरत काकडे यांनी.माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला . मनपा प्रभाग क्रमांक १९ मधील भाजपा पक्षाच्या उमेदवारांचा प्रचारासाठी ७ जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी गंगाप्रसाद काकडे यांच्या निवासस्थानी आले असता. यावेळी खासदार अजित गोपछडे, माजी जि.प.गंगाप्रसाद काकडे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे, शितल खांडेल,यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संघटक भरत काकडे यांनी भाजपा पक्षात प्रवेश केला यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.जुना कौठा,असरजन,धुमाळवाडी,वसरणी येथे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या यावेळी विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले होते.




## अबॅकस स्पर्धेत इन्सपायर अकॅडमी कंधारचे विद्यार्थी चमकले

कंधार (प्रतिनिधी)

येथील कै.दिगू पाटील लुंगारे सभागृह, सिद्धार्थ नगर कंधार येथे इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे शाखेच्या सचिव सौ. सत्यशीला भद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे संचलित सिद्धार्थ नगर कंधार शाखेचे विद्यार्थी नॅशनल लेवल स्पर्धेत चमकले असल्याने अकॅडमीच्या वतीने गुण गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अधक्ष्या चित्राताई लुंगारे होत्या तर उद्घाटक म्हणून महेश कागणे हे होते प्रमुख उपस्थिती चालीकवार मॅडम, अनावडे मॅडम हे होत्या. इन्सपायर अबकॅस अकॅडमी पुणे संचलित सिद्धार्थ नगर कंधार येथील शाखेच्या विद्यार्थीनी नॅशनल लेवल स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.गेल्या काही वर्षामध्ये गणिताची आकडेमोड बौद्धिक गणित व अबकॅसच्या माध्यमातून होत असून या उपकरणाद्वारे विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते.

## जेष्ठ महिला नागरीक कुसुमबाई दाचावार यांच्ये वृद्धापकाळाने निधन

नवीन नांदेड (प्रतिनिधी)



सिडको भागातील वात्सल्य नगर सोसायटी येथील जेष्ठ महिला नागरीक कुसुमबाई राम दाचावार वय ९० वर्ष यांच्ये वृद्धापकाळाने रहात्या निवासस्थानी ७ जानेवारी रोजी रात्री ११ वाजता निधन झाले,त्याचा पश्चात तीन मुले,दोन मुली नातु नातवंडे असा परिवार असुन व्यंकटेश्वर किराणा सिडकोचे रमेश दाचावार यांच्या त्या मातोश्री होत्या.त्याचां पार्थिव देहावर ८ जानेवारी रोजी सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी कुटुंबातील सदस्यांसह मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वारातीम विद्यापीठ परिसरात एकदिवसीय स्वच्छता शिबीर उत्साहात संपन्न

नांदेड (प्रतिनिधी)




युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशालय, पुणे तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात एकदिवसीय स्वच्छता शिबीर उत्साहात संपन्न झाले.

या शिबिरास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुहास पाठक व प्रा. अभय वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिबिराची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी स्वच्छता ही केवळ मोहिम नसून ती आपल्या दैनंदिन जीवनाची सवय बनली पाहिजे. स्वच्छ परिसरातूनच सुदृढ समाज आणि सशक्त राष्ट्राची निर्मिती होते, असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संरक्षण व सामाजिक जबाबदारी जपावी, असे आवाहन त्यांनी केले.

या स्वच्छता मोहिमेत राष्ट्रीय सेवा योजनेचे शंभरहून अधिक स्वयंसेवक विद्यार्थी, तसेच विद्यापीठातील संविधानिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाने सक्रिय सहभाग घेत विद्यापीठ परिसरातील रस्ते, मोकळी मैदाने व ओसाड जागांची स्वच्छता केली. यामध्ये सुमारे १५० किलो प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला.

यावेळी वृक्ष संवर्धनासाठी आळे तयार करणे, रस्त्यांची स्वच्छता तसेच ओसाड जागांचे व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला. सर्वांनी एकत्र येऊन केलेल्या या श्रमदानामुळे परिसर स्वच्छ व सुशोभित झाला.या उपक्रमामुळे स्वच्छतेबाबत जनजागृती होऊन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## सतीश हानमंते यांची नायगाव तालुका अध्यक्ष ,( अनु जाति ) कोंग्रेसच्य निवड

नायगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील बरबडा येथील सर्व सामान्य कुटुंबातील सतीश शिवाजी हानमंते यांची नायगाव तालुका अध्यक्ष निवड करण्यात आली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने माजी सरपंच भास्कररावजी धर्माधिकारी यांच्या घरी माझी नव्यानेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अनु-जाती विभाग नायगावतालुकाअध्यक्षपदी निवड केली त्या अनुषंगाने भव्य सत्कार सोहळा बरबडा येथे मोठ्या जल्लोषाने आणि शेकडो गावकऱ्यांच्या उपस्थित संपन्न झाला.. या सत्कार सोहळ्याला सर्व जाती धर्मातून आलेल्या माझ्या जुने जाणते मार्गदर्शक मंडळी ,तमाम मित्र मंडळी व समस्त गावकरी बांधवांनी शुभेच्छा दिल्या आहे.

येणाऱ्या काळात या मिळालेल्या संधीच सोन करत शोषित पीडित वंचित शेतकरी कष्टकरी कामगार नवतरुण यांच्या सेवेसाठी कायम तत्पर असेल आणि याच माध्यमातून या मिळालेल्या महत्वपूर्ण पदाला मी न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असेल. सतीश शिवाजीराव हणमंते बरबडेकर (ता.अध्यक्ष काँग्रेस कमिटी अनु.जा नायगाव) यांनी व्यक्त केले आहे

# श्री अय्यप्पा स्वामी दीक्षा पूर्ण करून दीक्षेधारी केरळ कडे मार्गस्थ

किनवट (प्रतिनिधी)

आज किनवट शहर व परिसरातील शेकडो भाविकांनी श्री अय्यप्पा स्वामीची ४१ दिवसांची कठोर दीक्षा पूर्ण करून केरळ राज्यातील शबरीमला येथे दर्शनासाठी प्रस्थान केले आहे. मकर संक्रांतीनिमित्त शबरीमला येथे प्रगट होणाऱ्या दिव्य मकरज्योतीचे दर्शन घेऊन ही दीक्षा पूर्णत्वास नेली जाणार आहे.या पार्श्वभूमीवर आज किनवट येथील श्री अय्यप्पा स्वामी मंदिर परिसरात सकाळपासूनच भक्तिमय वातावरण होते. येथे पारंपरिक इरुमुडी बांधण्याचा विधी पार पडला. त्यानंतर भाविकांसाठी भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मोठ्या संख्येने स्वामी व भाविकांनी सहभाग घेतला.४१ दिवसांच्या या कठोर दीक्षाकाळात स्वामींना एकवेळचे भोजन – ज्याला भिक्षा असे संबोधले जाते – करावे लागते. गळ्यात तुळशीमाळ, अंगावर पूर्ण काळे वस्त्र, जमिनीवर चटईवर शयन, पायात कोणतेही पादत्राण न घालणे आणि अखंड नामस्मरण ही या दीक्षेची वैशिष्ट्ये आहेत. किनवट व परिसरातील सुमारे ३०० ते ३५० स्वामी ही दीक्षा दरवर्षी श्रद्धेने धारण करतात.




शहरातील अय्यप्पा स्वामी मंदिरासह गजानन महाराज मंदिर, साईबाबा मंदिर, ब्रह्मगुरु मंदिर (सिरमेटी रोड), गोकुंदा आदी ठिकाणी स्वामी वास्तव्यास राहून आपले व्रत पूर्ण करतात. तसेच किनवट तालुक्यातील मांडवा, बेल्लोरी, अप्पारावपेठ, बोधडी, शिवणी, मांडवी, लिंगी, घोटी आदी गावांतील भाविकही ही दीक्षा श्रद्धेने पाळतात.

ही दीक्षा कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेपासून सुरू होते. मकर संक्रांतीच्या दिवशी शबरीमला येथे प्रगट होणाऱ्या मकरज्योतीच्या दर्शनाने या व्रताचा समारोप होतो. पहिल्यांदा दीक्षा धारण करणाऱ्या स्वामींना कन्या स्वामी असे संबोधले जाते. कन्या स्वामी भगवंतास विशेष प्रिय असतो, अशी श्रद्धा आहे. त्यानंतर सलग १८, २५ वर्षे अशा प्रकारे मंडल पूर्ण केली जातात. किनवट शहरात सलग ३१, २५, २१ व १८ वर्षे दीक्षा पाळणाऱ्या स्वामींची संख्या लक्षणीय आहे.दरवर्षी ७ जानेवारी रोजी किनवट येथील अय्यप्पा स्वामी मंदिरात भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचे आयोजन करून शबरीमला येथे जाणाऱ्या स्वामींना इरुमुडी प्रदान केली जाते. इरुमुडीमध्ये तूप, अन्न, वस्त्र आदी साहित्य असते. दीक्षा पूर्ण केलेल्या स्वामीने ही इरुमुडी डोक्यावर घेऊन पायी शबरीमला यात्रेला जायचे असते. दरम्यान स्वच्छतागृह वापरल्यास स्नान करूनच पुन्हा इरुमुडी डोक्यावर घ्यावी लागते. इरुमुडीतील साहित्य शबरीमला मंदिरात अर्पण केले जाते.किनवट येथे अय्यप्पा सेवा समितीचे विलास नेम्मानिवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण दीक्षा सोहळा पार पडतो. व्यंकटराव सातुरवार गुरु स्वामी, सच्चिदानंद पवार गुरु स्वामी, सुदाम जलगमवार गुरु स्वामी व राजू कट्टावार गुरु स्वामी यांच्या सहकार्याने विधी पार पाडले जातात. मंदिरातील दीक्षेचे पौराहित्य राकेश पांडे गुरुजी यांच्या हस्ते करण्यात येते. तसेच केरळ येथील पुरोहितांकडून महापडी पूजा व अन्य धार्मिक विधी संपन्न होतात.गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून किनवट व परिसरात दरवर्षी श्रद्धा, भक्ती व शिस्तीच्या वातावरणात श्री अय्यप्पा स्वामी दीक्षा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडत असून, यावर्षीदेखील भाविकांच्या उपस्थितीने हा सोहळा भक्तिमय झाला आहे.

# मुदखेड मध्ये मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

मुदखेड (प्रतिनिधी)

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ०६ जानेवारी १८३२ रोजी मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. महाराष्ट्रात सर्वत्र दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरात मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या फलकास पुष्पहार अर्पण करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर मुदखेड नगर परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ विश्रांती पाटील कदम यांच्या वतीने पत्रकारांना लेखणी व डायरी पुष्प देऊन स्वागत करण्यात आले पत्रकाराने शहर विकासासाठी अनेक उपयोजना सुचवून सकारात्मक बातम्या देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नूतन नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम यांनी केले. यानंतर माधव पाटील कदम यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या.




यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के, नगरसेवक संजय आऊलवार,संदिप मोडवान यांनी आपले विचार मांडले. माजी नगरसेवक कैलास गोडसे, अभियंता सुमित गोडसे यांनी जनसंपर्क कार्यालयात समस्त पत्रकारांना दस्ती लेखणी पुष्प देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या वतीने डायरी लेखणी पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बँकेच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला.

मुदखेड पोलीस ठाण्याचे पो. नि. यांनी पत्रकारांच्या लेखनीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले जाते शासन प्रशासन सुरळीत चालण्यासाठी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचे महत्त्वपूर्ण काम असून पत्रकारांनी निर्भीडपणे कार्य करत राहावे पोलीस प्रशासन आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन पाशाभाई, ईश्वर पिन्नलवार जिल्हा सहसचिव, संजय कोलते, संतोष पाटील गाढे, जयराम वन्ने, उत्तम हनुमंते,रुखमाजी शिंदे साहेबराव गागलवाड, नामदेव राहेरे, अतिक अहेमद, दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, धम्मदाता कांबळे, अब्दुल रझाक, संतोष सावंत, शेख इरफान, संतोष दर्शनवाड,शेख शमशुद्दीन, मनोज कमटे, देवानंद गुंजाळ, आशिष कल्याने अमोल टेकले, हाफिज खुरेशी, म.हाकिम, पिराजी गाडेकर,अजय कांबळे, यासह आदींची उपस्थिती होती. सर्व नियोजित कार्यक्रमात सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते जिल्हा संघटक यांनी केले. दर्पण दिनानिमित्त शहरात अनेक ठिकाणी पत्रकार संघाच्या सदस्यांना पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.